सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १८ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## कॅनडावरून परततांना अमेरिकेला याल का? ट्रम्प यांचे निमंत्रण पंतप्रधान मोदींनी नाकारले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरून संवाद साधला. यावेळी ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदी यांना कॅनडामध्ये आयोजित जी७ शिखर परिषदेतून परतताना काही वेळासाठी अमेरिकेत थांबण्याची विनंती केली. मात्र, पंतप्रधान मोदींनी यासाठी नकार दिला. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी यासंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले, फोनवरील हे संभाषण जवळपास ३५ मिनिटे चालले. दरम्यान दोन्ही देशांच्या नेत्यांनी विविध जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा केली.



परराष्ट्र सचिव म्हणाले, आपण कॅनडातून परतताना अमेरिकेत येऊ शकता का? असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विचारले होते. यावर पंतप्रधान मोदी यांनी पूर्व निर्धारित कार्यक्रमांचा हवाला देत असमर्थता व्यक्त केली. खरे तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या तीन देशांच्या दौऱ्यावर आहेत. सायप्रस येथून ते कॅनडा येथे जी७ परिषदेत भाग घेण्यासाठी गेले होते. यानंतर ते क्रोएशियाला गेले.

ट्रम्प यांच्यासोबत झालेल्या चर्चेदरम्यान 'ऑपरेशन सिंदूर' आणि भारताने केलेल्या दहशतवाद विरोधी कारवाईवर प्रामुख्याने चर्चा झाली. यावेळी, 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामासाठी कुठल्याही तिसऱ्या पक्षाची मध्यस्थी अथवा भारत-अमेरिका व्यापार कराराची कोणतीही भूमिका नव्हती.

**ऑपरेशन सिंदूर आणि भारताची भूमिका**

पाकिस्तानी दहशतनादी २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरातील पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला केला होता. या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. यानंतर, भारताने ७ मे रोजी पाकिस्तान विरोधात ऑपरेशन सिंदूरला सुरूनात केली होती. या कारवाईत भारताने पीओके आणि पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणांना निशाणा बनवले होते. यासंदर्भात टम्प यांना माहिती देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, भारताची कारवाई अत्यंत संतुलित, अचूक आणि तनावही वाढणार नाही, अशा प्रकारची होती. याशिवाय, भारताने नेहमीच दहशतवादाविरोधात कठोर भूमिका घेतली आहे, असेही मोदी यावेळी म्हणाले.

**भारताने मध्यस्थीची शक्यता फेटाळली**

ट्रम्प यांच्यासोबतच्या या संभाषणादरम्यान, मोदी म्हणाले, भारताने कधीही कोणत्याही तिसऱ्या पक्षाची मध्यस्थी स्वीकारली नाही आणि भविष्यातही कधी स्वीकारणार नाही. तत्पूर्वी, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामासाठी अमेरिकेची भूमिका होती, असा दावा ट्रम्प यांनी केला होता. मात्र, भारताने हे दावे फेटाळून लावले आणि युद्धविराम दोन्ही देशांच्या परस्पर संमतीने झाला, ज्यात कुठल्याही बाह्य शक्तीची मध्यस्थी नव्हती, असेही मोदी म्हणाले.

## मुख्यमंत्री फडणवीसांना विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचं निमंत्रण, ५ वर्षांनी करणार आषाढीची महापूजा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१८विदर्भ प्रजासत्ताक**

जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांची पालखीचे आज देहूतून प्रस्थान होणार आहे. तर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचं प्रस्थान गुरुवारी होणार आहे. बुधवारी दुपारी अडीच वाजता तुकोबारायांची पालखी आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. या सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, यंदाच्या आषाढी महापूजेसाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने मुख्यमंत्री फडणवीस यांना निमंत्रण दिलंय. पाच वर्षांनी पुन्हा फडणवीस विठ्ठलाची शासकिय महापूजा करणार आहेत.मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ मध्ये



आषाढी एकादशीला शेवटची शासकीय पूजा केली होती. त्यानंतर आता पाच वर्षानी ६ जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्री म्हणून फडणवीस सपत्नीक विठ्ठलाची शासकीय महापूजा करतील. विठ्ठल मंदिर समितीने फडणवीस यांना महापूजेसाठी निमंत्रण दिलं आहे.यंदाच्या आषाढी एकादशीला महापूजेसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक यावे असं निमंत्रण मंदिर समितीकडून फडणवीस यांना देण्यात आले. मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर, सदस्य शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ज्ञानेश्वर देशमुख यांनी फडणवीस यांना निमंत्रण देण्यासाठी भेट घेतली. तसंच यावेळी आषाढी यात्रेच्या नियोजनाची आणि विठ्ठल मंदिराच्या जतन व संवर्धन कामाची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांना देण्यात आली.

## इंग्रजीचा पुरस्कार अन् भारतीय भाषांचा तिरस्कार हे योग्य नाही, आपली भाषा...; मुख्यमंत्री फडणवीसांचे राज यांना उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

हिंदीची सक्ती महाराष्ट्रात होऊ देणार नाही. हिंदीची सक्ती गुजरात, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळमध्ये नाही मग महाराष्ट्रातच ही सक्ती का लादली जाते? जो पर्याय सहावीपासून आहे तो पहिलीपासून का आणताय? ख-ड अधिकाऱ्यांना महाराष्ट्रात हिंदी बोलणे सोपे जावे, मराठीची गरज भासणार नाही यासाठी ही सक्ती आहे का? असे विविध प्रश्न विचारत राज ठाकरे यांनी आज महायुती सरकारला धारेवर धरलं होतं. राज्य सरकारने तात्काळ हिंदीची सक्ती मागे घ्यावी, असा इशाराही मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी दिला होता. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर उत्तर दिले.




**राज ठाकरेंच्या आरोपांना दिलं उत्तर**

नव्या शैक्षणिक धोरणाने मराठीला वैश्विक भाषा बनवली आहे. मराठी अनिवार्यच असणार आहे. हिंदीला पर्याय असेल. माझी राज ठाकरेंशी चर्चा झाली. त्यांचा आग्रह आहे की, दोनच भाषा हव्यात. पण मी सांगितले की देशात तीन भाषांचे सूत्र आहे, महाराष्ट्र दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही. आपली भाषा शिकत असताना एखादी भारतीय भाषा शिकली तर त्यात गैर काय? आपल्या भाषेला डावलले गेलेले नाही. मुले नवी भाषा शिकतील तर अधिक ज्ञान मिळवतील. राज यांचा आग्रह असला तरीही देशभरातील जाणकारानी शैक्षणिक धोरण तयार केलेले आहे.

हिंदी आधी अनिवार्य होती, पण आता ती अनिवार्यता काढून टाकली आहे. आता मुलांना कुठलीही तिसरी भारतीय भाषा शिकता येईल. नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषा अनिवार्य आहे. त्यासोबत इतर दोन भाषांपैकी एक भारतीय भाषा असायला हवी. आपल्याकडे स्वाभाविकपणे इंग्रजी स्वीकारली जाते, त्यासोबत हिंदी म्हटले होते. कारण हिंदीचे शिक्षक उपलब्ध होतात. पण आता ती अनिवार्यता काढलेली आहे. कुठलीही भारतीय भाषा तिसरी भाषा म्हणून शिकता येईल. आज केलेल्या बदलात हिंदीची अनिवार्यता काढून कुठलीही तिसरी भाषा शिकण्याचा पर्याय दिलेला आहे. भारतीय भाषा इंग्रजीपेक्षा चांगल्या आहेत. पण इंग्रजीचा पुरस्कार अन् भारतीय भाषांचा तिरस्कार हे योग्य नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शैक्षणिक धोरणातील हिंदीचा समावेश यावर मत व्यक्त केले.

## 'मनसेसोबत युती केली तरच फायदा होईल' उद्धव ठाकरेंच्या बैठकीत राज ठाकरेंसोबत जाण्याचा 'सूर'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १८मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र येणार का हीच चर्चा सुरु आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी युती करावी अशी दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांची इच्छा आहे. उद्धव ठाकरे यांनी मनसेसोबत युती करायची का नाही यासंदर्भात माजी नगरसेवकांना विचारणा केल्याची माहिती समोर आली आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना युती केली तर



फायदाच होईल अशी कबुली नगरसेवकांनी दिली आहे. मुंबईतल्या युती संदर्भात अनुकूल वातावरण असल्याचेही माजी नगरसेवकांनी उद्धव ठाकरेंना सांगितले. त्यामुळे आता उद्धव ठाकरे युतीसंदर्भात काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष्य लागले आहे.

आगामी महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी माजी नगरसेवकांची मातोश्री निवासस्थानी बैठक घेतली. महापालिकेसाठी काय रणनिती आखण्यात यावी यासंदर्भात चर्चा करण्यात आली. ठाकरेंची शिवसेना आणि मनसेची युती होणार का याबाबतही या बैठकीत चर्चा झाली. यावेळी उद्धव ठाकरेंनी काही माजी नगरसेवकांना आपण युती करायची का अशी विचारणा केली. माजी नगरसेवकांची मते जाणून घेऊन निर्णय घेण्याचे उद्धव ठाकरेंनी योजना आखली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या या प्रश्नावर माजी नगरसेवकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. मनसेसोबत युती केली तर फायदाच होईल आणि त्यासाठी अनुकूल वातावरण असल्याचे माजी नगरसेवकांनी उद्धव ठाकरेंना सांगितले. त्यावर बोलताना मुंबई पालिकेसाठी आपल्याला पालिकेसाठी ज्या पक्षासोबत युती करायची त्यासाठी तुम्हाला विश्वासात घेऊन निर्णय घेईन, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## सहा राज्यांत 'मोस्ट वाँटेड', तीन कोटींचे बक्षीस असलेला माओवादी रवी ठार, महिला माओवादी अरुणाचाही खात्मा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ गडचिरोली**

जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात माओवादी कारवायांत सहभागी असलेला तसेच सहा राज्यांत धुमाकूळ घालून सुरक्षा यंत्रणेला आव्हान देणारा जहाल माओवादी गजर्ला रवी ऊर्फ , उदय उर्फ गणेश याला ठार करण्यात १८ जूनला यश आले. त्याच्या डोक्यावर तीन कोटींचे इनाम होते. आंध्रप्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्याच्या मारडपल्ली जंगलात तीन माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला. यात गजर्ला रवी ऊर्फ गणेशसह महिला माओवादी अरुणाचा समावेश आहे.

गजर्ला रवी ऊर्फ उदय, उर्फ गणेश हा माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य होता. त्याचा खात्मा झाल्याने माओवादी चळवळीला जबर हादरा बसला आहे. माओवाद्यांनी केलेल्या अनेक मोठ्या हल्ल्यांमागे त्याचा हात होता. मूळचा तेलंगणातील रहिवासी असलेल्या रवी उर्फ उदयवर आंध्रप्रदेश, तेलंगणा,



छत्तीसगड, ओडिशा, महाराष्ट्र आणि झारखंड या सहा राज्यांमध्ये मिळून तीन कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.रवी माओवाद्यांच्या आंध्रा-ओरिसा बॉर्डर समितीचा सचिव तसेच आंध्र प्रदेश स्पेशल झोनल समितीचा सदस्य म्हणूनही कार्यरत होता. तीन राज्यांच्या सीमावर्ती भागांमध्ये त्याचा मोठा प्रभाव होता. त्याच्यासोबत अरुणालाही जवानांनी ठार केले. ती माओवाद्यांच्या केंद्रीय समिती सदस्याची पत्नी होती. तसेच, ती वरिष्ठ माओवादी नेता चेरकुरी राजकुमार ऊर्फ आझादची बहीण होती. तिच्यावरही ५० लाख रुपयांचे बक्षीस होते.

**पहाटेपासून चकमक सुरू**

आंध्रप्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यात मारडपल्लीच्या दुर्गम वनक्षेत्रात भागात जवान आणि माओवाद्यांमध्ये १८ जून रोजी पहाटे पाच वाजेपासून चकमक सुरू आहे. या चकमकीत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले असून, तीन माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला. तिसऱ्या माओवाद्याची ओळख पटविण्याचे काम सुरु आहे.

## पंढरपूर वारीसाठी रेल्वेकडून ८० ट्रेन, वारकऱ्यांसाठी विशेष सेवा चालवणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

वटपौर्णिमा म्हणजेच ज्येष्ठ पौर्णिमा झाली की, सर्वांनाच आषाढी एकादशीचे वेध लागतात. संतांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने जातात. लाखो वारकरी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतात. आषाढ महिन्यातील शुद्ध एकादशीस महाएकादशी किंवा शयनी एकादशी म्हणतात. प्रत्येक महिन्याच्या शुक्ल व कृष्ण पक्षांतील अकरावी तिथी एकादशी या नावाने संबोधिली जाते. विष्णूची अत्यंत प्रिय



तिथी, अशी तिची प्रसिद्धी आहे. प्रत्येक महिन्यात दोन याप्रमाणे वर्षातून २४ एकादशी येतात. उपवास व जागरण करून संपूर्ण दिवस हरिकीर्तनात घालविणे हा या दिवसाचा विशेष आहे. वारकऱ्यांच्या सोयीसाठी रेल्वेकडून ८० विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आषाढी वारीसाठी मध्य रेल्वेकडून पंढरपूरसाठी ८० पेक्षा अधिक विशेष ट्रेन चालवल्या जात आहेत. सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील भाविकांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेची ही सेवा असणार आहे. पुणे, नागपूर, अमरावती, कलबुर्गी, भुसावळ अशा अनेक महत्त्वाच्या रेल्वे स्थानकावरून या ट्रेनची सेवा सुरू करण्यात येणार आहे. यामुळे वारीसाठी, आषाढी एकादशीसाठी पंढरपूरला येणाऱ्या भाविकांची सोय होणार असल्याचे सांगितले जात आहे.

## गेल्या दोन वर्षांत वारी काळात २४ वारकऱ्यांचा मृत्यू सहायता निधीतून वारसांना दमडीही नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

आषाढी वारी काळात गेल्या दोन वर्षात संतांच्या पालखी सोहळ्यात चालणाऱ्या सुमारे २४ वारकऱ्यांचा मृत्यू झाला; परंतु शासनाच्या मुख्यमंत्री सहायता निधीतून एक रुपयाही मयत वारकऱ्यांच्या वारसाच्या खात्यात जमा झाला नाही.

सन २०२३ मध्ये राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ



शिंदे यांनी आषाढी वारी काळात संतांच्या पालख्यांसोबत चालणाऱ्या वारकऱ्यांचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसास प्रत्येकी पाच लाख रुपये मदत देण्याची घोषणा केली होती.

सन २०२३ मध्ये राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी वारी काळात संतांच्या पालख्यांसोबत चालणाऱ्या वारकऱ्यांचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसास प्रत्येकी पाच लाख रुपये मदत देण्याची घोषणा केली होती. गेल्या दोन वर्षात वारीमध्ये जवळपास २४ वारकऱ्यांचा मृत्यू झाला होता. या मृत वारकऱ्यांची नावे या पालखी सोहळाप्रमुखांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे दिली होती; परंतु एक रुपयाही वारसाला मिळाला नाही.

## संपादकीय ......

# डिजिटल जनगणना

केंद्र सरकारने जातींच्या आकडेवारीसह जनगणना करण्याचा निर्णय याच महिन्याच्या सुरुवातीला घेतला असून, ही जनगणना दोन टप्प्यांत पूर्ण केली जाईल. २१ महिन्यांनंतर अर्थात १ मार्च २०२७ पासून जनगणनेला सुरुवात होणार आहे. यावेळी फॉर्ममध्ये जातीचाही कॉलम राहणार आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशांसह उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये ऑक्टोबर २०२६ पासून जनगणनेला सुरुवात होईल. शेवटची जनगणना २०११ मध्ये करण्यात आली होती आणि तीही दोन टप्प्यांतच झाली होती. पहिल्या टप्प्यात त्यावेळी घरांची यादी आणि दुसर्या टप्प्यात लोकसंख्येची माहिती गोळा करण्यात आली. २०११ मध्ये देशाची लोकसंख्या सुमारे १ अब्ज २१ कोटी एवढी होती. आधीच्या जनगणनेनुसार, त्यात १७ टक्क्यांची वाढ झाली होती. २०११ मध्ये सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य उत्तर प्रदेश होते. त्याची लोकसंख्या १ कोटी ९९ लाख होती. सर्वात कमी लोकसंख्या लक्षद्वीपची होती आणि तेथील लोकसंख्या ६४ हजार होती. 'वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्ह्यू' संस्थेनुसार, या वर्षाच्या शेवटी भारताची लोकसंख्या दीड अब्जापर्यंत पोहोचणार आहे.

भारतात एका दिवसात ६३,१७१ मुले जन्माला येतात, तर मृत्यूची संख्या २६,६०४ आहे. जनगणनेतून मिळणार्या मौलिक आणि साधार माहितीचा धोरण ठरवण्यासाठी उपयोग होतो. देशातील १६व्या जनगणनेसाठी केंद्राने सोमवारी अधिसूचना काढली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ही जनगणना मोबाईल ॲप्लिकेशन वापरून, डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. लोकांना स्वगणनेची सुविधाही उपलब्ध करून दिली जाईल. जनगणनेचे डिजिटायझेशन करण्याचे अनेक फायदे आहेत. जन्म आणि मृत्यूचे रजिस्टर मतदार याद्यांना जोडल्यास या याद्या आपोआप अद्ययावत होऊ शकतील. डिजिटल जनगणनेला काही सॉफ्टवेअरची जोड दिल्यास आधार कार्ड, पासपोर्ट, बँक कार्ड, मतदार ओळखपत्र, वाहन परवाना यांची माहिती एकाच कार्डमध्ये ठेवणे शक्य होऊ शकते. त्यामुळे विविध कार्ड जवळ बाळगावी लागणार नाहीत.

नव्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे डिजिटल जनगणना अधिक गतिमान असेल. तसेच लोकांना कुटुंबीयांसंबंधीची माहिती ॲपद्वारे स्वतःच भरता येईल. डिजिटल सुरक्षा लक्षात घेऊन, त्या दृष्टीने तयारीही सरकारने केली आहे. माहितीचे संकलन, हस्तांतरण आणि साठवणुकीबद्दलचे कडक नियम तयार केले आहेत. त्यामुळे माहिती सुरक्षित राहील. चुकीच्या व्यक्ती वा संस्थांद्वारे माहितीचा गैरवापर होणार नाही, अशी अपेक्षा आहे. कारण, नागरिकांचे खासगीपण जपलेच पाहिजे. यापूर्वी काही वेळा नागरिकांच्या 'डेटा'ला गळती लागून, कंपन्यांनी त्याचा स्वतःच्या मार्केटिंगसाठी वापर केल्याची उदाहरणे घडलेली आहेत. त्यामुळे यादृष्टीने कठोर उपाययोजना राबवल्या जातील, अशी आशा. डिजिटल जनगणनेमुळे या प्रक्रियेत शास्त्रशुद्धता येईलच शिवाय सरकारी योजनेचे लाभ देतानाही ते योग्य व्यक्तींपर्यंत अचूकपणे पोहोचण्यास मदत होईल.

जनगणनेनुसार नोंदणी झाल्यामुळे व्यक्तीची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आपोआपच त्याचे नाव मतदार यादीत जोडण्यात येणार आहे. तसेच व्यक्तीला आपले नाव आणि पत्ता बदलणेही सोपे होणार आहे. ई-जनगणनेमुळे जन्म-मृत्यूची नोंदणीही सोबत जोडण्यात येईल. यामुळे जन्मलेल्या व्यक्तीचे नाव आपोआप जनगणनेच्या यादीत समाविष्ट होईल, तर व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे नाव या यादीतून वगळण्यात येईल. परिणामी, जनगणना सातत्याने अपडेट आणि अद्ययावत होत राहील.

येणार्या २५ वर्षांच्या धोरणांना आकार देणारी ही जनगणना असेल. आतापर्यंत प्रक्रियेत प्रत्येक घरी जाणे आणि फॉर्म भरणे आवश्यक होते. यावेळीही घरोघरी कर्मचारी जातीलच; पण त्यांच्याजवळ स्मार्ट फोन किंवा टॅबलेट असेल. त्याद्वारे ते माहिती भरतील. सर्व माहिती मोबाईल ॲपमध्ये भरली जाईल. याशिवाय माहितीचे व्यवस्थापन आणि देखभालीसाठी एक जनगणना पोर्टलही असेल. १ जुलै २०१५ रोजी देशात 'डिजिटल इंडिया अभियाना'ची सुरुवात केली गेली. जनजागृतीसाठी ३६ राज्यांत आणि सहाशे जिल्ह्यांत विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले. देशातील प्रशासनातील जनतेचा सहभाग वाढवणे, ते अधिक पारदर्शी बनवणे आणि शासकीय कारभार लोकाभिमुख करणे अशा उद्देशाने अभियान सुरू करण्यात आले होते. माहिती -तंत्रज्ञानावर आधारित सशक्त अर्थसत्ता बनण्यासाठी हे गरजेचेच होते.डिजिटल लॉकर, ई-एज्युकेशन, ई-हेल्थ, ई-साईन आणि नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल यासारख्या योजनांवर सरकारने १ लाख कोटी रुपयांचा अधिक खर्च केला आहे. ११ राज्यांत 'भारत नेट' आणि 'नेक्स्ट जनरेशन नेटवर्क' योजना राबवली आहे. नागरिकांना सरकारी सुविधांचा व योजनांचा लाभ घेता यावा, यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर देशाने सुरू केला आहे. डिजिटल इंडिया पोर्टलचे 'स्वच्छ भारत ॲप'ही लोकप्रिय आहे. प्रत्येक नागरिकांसाठी डिजिटल सोयी-सुविधा पुरवल्या जात आहेत. यावेळी जनगणनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये घर नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यामध्ये कुटुंबाची मालमत्ता, कुटुंबाचे उत्पन्न, घराची स्थिती आणि सुविधा आदींची माहिती डिजिटल स्वरूपामध्ये गोळा केली जाईल. रहिवासी घरबसल्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतील. दुसर्या टप्प्यात लोकसंख्येची मोजणी केली जाईल. त्यामध्ये घरात राहणार्या प्रत्येक व्यक्तीची नोंद होईल. त्याशिवाय सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर वैयक्तिक माहिती गोळा केली जाईल.जनगणनेच्या या प्रचंड मोठ्या मोहिमेमध्ये ३४ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षक व १ लाख ३० हजार जनगणना कर्मचारी सहभागी होणार आहेत. डिजिटल जनगणनेचे त्यांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाईलच. भारतातील डिजिटल क्रांतीची जगभर प्रशंसा झालेली आहे. आता डिजिटल जनगणना यशस्वीपणे पार पडल्यास जगातील एका मोठ्या लोकशाही देशाची प्रतिमा आणखी उंचावेल. त्याचबरोबर लोकसंख्येचे शास्त्रीय मानकांनुसार मापन केले जाईल. विकासाचे नवे संकल्प आणि योजना करताना या नेमक्या माहितीचा उपयोग होईलच. ते साध्य करणेही थोडे सोपे जाईल. विशेष म्हणजे, या नव्या गणनेतून वंचित जात समूहांना, घटकांना विकासाची दारे खुली होतील.

# ज्येष्ठ नागरिकांची ऑनलाईन अपिल सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती, -** आई वडील व ज्येष्ठ नागरिकांचा चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियमानुसार दाखल करण्यात आलेल्या अपिलाची सुनावणी ऑनलाईन करण्यात आली. यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि त्यांच्या वकीलांना आहे त्याच ठिकाणाहून अपिल सुनावणीला उपस्थित राहता आले. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना अपिल सुनावणीसाठी येण्याचा त्रास वाचला आहे.



जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे आई वडील व ज्येष्ठ नागरिकांचा चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियमाच्या कलम १६ नुसार उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाविरूद्ध दोन अपिल करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक आणि त्यांच्या वकीलांच्या सोयीसाठी सदर अपिल सुनावणी ऑनलाईन घेण्याचा निर्णय जिल्हाधिकारी यांनी घेतला. याबाबत अर्जदार आणि त्यांच्या वकीलांना कळविण्यात आले. दरम्यान आज महसूल भवनात गुगल मिटच्या सहाय्याने ऑनलाईन सुनावणी घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसिलदार प्रशांत पडघन यांच्यासह वकील आणि अर्जदार ऑनलाईन उपस्थित होते.

आज झालेल्या सुनावणीत हरिदास वर्धे विरूद्ध नाना वर्धे आणि हर्षल यावले विरूद्ध वच्छलाबाई यावले या दोन अपिल सुनावणीमध्ये बक्षीसपत्र करून देण्याबाबत वाद सुनावणीसाठी घेण्यात आले. यात दोन्ही पक्षांना ऑनलाईन म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून पुढील आठवड्यात अंतिम सुनावणी ठेवण्याची सुचना केली. तसेच वकीलांना प्रत्यक्षात कागदपत्रे सदर करण्यासाठी निर्देशित करण्यात आले.आजच्या सुनावणीमध्ये ज्येष्ठ नागरिकांकडून बक्षीसपत्र करून घेण्यात आले. मात्र बक्षीसपत्रात नमूद अटी शर्तीचे पालन होत नसल्याने याबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमानुसार अर्ज सादर करण्यात आला. उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाविरूद्ध जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल अर्ज सादर करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांचे वय अधिक असल्याने जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी अपिल सुनावणी ऑनलाईन घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दोन्ही पक्ष आणि वकीलांना याबाबत माहिती देण्यात आली. त्यानुसार आज विनाव्यत्यय अपिल सुनावणी घेण्यात आली. जिल्हाधिकारी यांच्या ऑनलाईन सुनावणीच्या निर्णयाचे दोन्ही पक्ष आणि वकीलांना स्वागत केले.




## लठ्ठपणा कमी करायचा आहे?तर मग जाणून घ्या काय आहे '५ पी' सूत्र?

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक ७

फास्ट फूड, व्यायामाचा अभाव आणि अनियमित जीवनशैलीमुळे लठ्ठपणा ही एक गंभीर आरोग्य समस्या बनत चालली आहे. यावर उपाय म्हणून भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (ऋडड-ख) ने आहारातील '५ पी' (५झ) या अभिनव तत्त्वांची शिफारस केली आहे. या उपक्रमाचा उद्देश आहे लोकांना संतुलित, सुरक्षित आणि आरोग्यदायी जीवनशैलीकडे वळवणे.



**फळे, भाज्या आणि पाणी मुबलक प्रमाणात**

दररोज आहारात ताजे फळे, हिरव्या भाज्या आणि भरपूर पाणी घेणे शरीरासाठी आवश्यक पोषकतत्त्व पुरवते आणि पचनक्रिया सुधारते. यामुळे शरीर हायड्रेट राहते व आजारांना दूर ठेवण्यास मदत होते.

**(सुदृढ फॅट्सचा समावेश):**

आरोग्यदायी वसा, जसे की ऑलिव्ह तेल, बदाम, अक्रोड, फ्लॅक्स सीड्स यांचा वापर करावा. हे हृदयासाठी फायदेशीर असून कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवतात आणि लठ्ठपणावर नियंत्रण मिळवतात.

संतुलित पोषणाचा आहार

प्रथिने, कार्बोहायड्रेट आणि चरबी यांचे योग्य प्रमाण असलेला आहार मांसपेशींना बळकट करतो, ऊर्जा पुरवतो आणि शरीरक्रिया सुरळीत ठेवतो.

**भोजन वेळेचे नियोजन**

ठरावीक वेळेवर जेवण करणे आणि दोन जेवणांमध्ये कमीत कमी ४ तासांचे अंतर ठेवणे आवश्यक आहे. वारंवार खाण्याची सवय टाळा आणि अन्न नीट चावून खा.

**अन्नाची मात्रा आणि निवडीकडे लक्ष द्या):**

जंक फूड टाळा, योग्य प्रमाणात पौष्टिक अन्न खा. अति खाणे टाळल्यास पचनक्रिया सुधारते आणि वजन वाढण्याची शक्यता कमी होते.

# नर्सरीमधून फळांची रोपे खरेदी करताना त्यांची निवड कशी करावी? लागवड कशी करावी? वाचा सविस्तर

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील पडीक जमिनीला मिळालेले वरदान ठरली, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. राज्यात आतापर्यंत ३० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर फळबागा उभ्या आहेत.

रोपवाटिकेतून फळांची रोपे घेताना त्यांची निवड कशी करावी? तसेच नवीन रोपांची/कलमांची लागवड कशाप्रकारे करायची हे सविस्तर पाहूया.

**कलमांची निवड कशी कराल?**

फळबागांपासून काही वर्षाच्या मेहनतीनंतर उत्पन्न देणारे झाड न मिळाल्यास ते तोडून दुसरे लावणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही.

फळझाडांची कलमे, रोपांच्या निवडीवर फळांची गुणवत्ता आणि फळबागेचे एकूण यश अवलंबून असते आणि म्हणून फळपिकाच्या वागेकरिता उत्कृष्ट आणि गुणवत्ता माहित असलेली दर्जेदार आणि खात्रीशीर कलमे रोपे आणावी.

शक्य असल्यास रोपे फक्त कृषी विद्यापीठ किंवा शासकीय रोपवाटिकेमधून खरेदी करावीत.

शक्य नसल्यास आपल्या माहितीतील शासकीय परवानाधारक रोपवाटिकेतून कलमे/रोपे घ्यावीत.

**खरेदी केलेल्या रोपांची पक्की पावती घ्यावी.**

कलमांची निवड करताना ती किती उंच आहेत यापेक्षा ती योग्य त्या जातीच्या मातृ-वृक्षापासून केलेली आहेत कि नाहीत याबाबींकडे अधिक लक्ष द्यावे.

रोपे घेताना कलम बांधलेली आहेत व जोड पूर्णपणे जुळलेले आहेत याची खात्री करून घ्यावी.

त्याचबरोबर ती वाढीला जोमदार आहेत निरोगी आहेत, आपणास पाहिजे त्याच जातीची आहेत याची खात्री करूनच खरेदी केली पाहिजेत.

**नवीन रोपांची/कलमांची लागवड कशी करावी?**

लागवड करण्यापूर्वी प्रथम कलमाच्या पिशवीच्या दोन्ही बाजूंवर उभा काप द्यावा व

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष



मुळाभोवती असलेला मातीचा गोळा न फुटता पॉलिथीन बॅग अलगद काढावी.

मोकळा झालेला गोळा दोन्ही हातात धरून खड्ड्याच्या मधोमध ठेऊन हलकेच दाबावा व मोकळ्या हाताने माती भरून गोळ्याभोवती माती टाकावी.

अगोदर हाताने व नंतर पायांनी दाबावी, हे करताना मातीच्या गोळ्यावर पाय किंवा वजन पडणार नाही याची काळजी घ्यावी.

आवश्यकता वाटल्यास हलकेसे पाणी द्यावे आधारासाठी पश्चिम बाजूत ६ इंच अंतरावर ४ ते ५ फुट बांबूची काठी रोवून त्याला कलम बांधावे.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# नानोरीच्या सरपंच पल्लवी मस्के अपात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८चांदुर बाजार** तालुक्यातील नानोरी ग्रामपंचायतीच्या सरपंच पल्लवी मस्के यांना विभागीय आयुक्तांनी बेकायदेशीर मालमत्ता फेरफार प्रकरणात दोषी ठरवत सरपंच व सदस्यपदावरून ठरविले आहे. अपात्रनानोरी येथील रहिवासी सोनू उर्फ निलेश विलासराव राऊत यांनी केलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे आजोबा गणेशराव राऊत यांच्या नावावरील मालमत्ता सोनू यांच्या काकांनी बेकायदेशीरपणे आपल्या नावावर केली होती. याबाबत सोनू यांनी गटविकास अधिकारी, चांदूरबाजार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीत सरपंच, उपसरपंच आणि सर्व सदस्यांना अपात्र ठरविण्याची मागणीकरत सदर मालमत्तेचा पूर्वस्थितीवर फेरफार

## बेकायदेशीर मालमत्ता फेरफार प्रकरणात कारवाई

आणि चौकशीची विनंती केली होती.जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. मात्र, सरपंच पल्लवी मस्के यांनी मुख्य अधिकाऱ्यांच्या कार्यकारी आदेशानुसार सदर फेरफार रद्द न केल्याने चौकशीचे आदेश जारी झाले. चौकशीत सदर फेरफार बेकायदेशीर असल्याचे आढळून आले आणि यात सरपंच जबाबदार असल्याचे प्रथम निदर्शनास आले.परिणामी, ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९ (१) अंतर्गत पल्लवी मस्के यांना सरपंच व सदस्यपदावरून अपात्र ठरविण्यात आले.

# मार्डी मार्गावर जोडप्याला लुटणाऱ्या दोघांची कारागृहात रवानगी

## ८ ते १० घटनांची दिली कबुली, फिर्यादी समोर यायला तयार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**रात्रीला मार्डीरोड मार्गाने फिरणाऱ्या जोडप्याला चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या दोघांनी आतापर्यंत ८ ते १० घटना केल्याची कबुली दिली. परंतु तक्रार दाखल नसल्यामुळे पोलिसांना पुढील कारवाई करता आली नाही. मंगळवारी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. पोलिसांनी त्यांची कारागृहात रवानगी केली. इजानोद्दीन पठाण हकीमोद्दीन पठाण (वय २२) आणि अमीर खान इरफान खान (वय ३०, दोन्ही रा. इंदला) अशी अटकेतील लुटारूंची नावे आहेत.पुष्कल नावाळे हा रविवारी रात्री १० वाजताच्या सुमारास दुचाकीने मार्डीरोड मार्गावरील इंदला फाट्याजवळ हॉटेल रिलॅक्स जवळील लेआऊटमध्ये बसला होता. तेव्हा दोन युवक आले आणि नावाळेच्या पोटाला चाकू लावून त्याला पैशाची मागणी केली. त्याच्याकडे पैसे नव्हते त्यामुळे त्याने भावाला फोन पे ने ३ हजार रुपये मागितले. त्यानंतर लुटारू राजुरा येथील पेट्रोल पंपावर गेला आणि मॅनेजरला ३ हजार रुपेय फोन पे करून त्याच्याकडून कॅश घेतली आणि तेथून निघून गेले. या घटनेत पोलिसांनी नावाळेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आणि रात्रीच दोन्ही लुटारूंना अटक केली. न्यायालयाने दोघांना एक दिवसाची कोठडी दिली होती. पोलीस कस्टडीत त्यांनी आतापर्यंत या मागनि रात्रीलाजाणाऱ्या ८ ते १० जोडप्याला रस्त्यात अडवून लुटल्याचे सांगितले. मात्र त्यापैकी कोणी तक्रार देण्याकरिता आले नाही. त्यामुळे दोघांनी पैसे लुटल्यानंतर बळजबरीसुध्दा केली असेल आणि बदनामीच्या भीतीने कोणी तक्रार देण्याकरीता आले



नसेल असा संशय पोलिसांना आहे. पोलीस या प्रकरणात सखोल तपास करीत आहे. तसेच पुष्कल नावाळे एकटा होता की त्याच्यासोबत युवती होती याबाबत सुध्दा पोलीस चौकशी करीत आहेत. या कारवाईत पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निलेश गावंडे, पोलीस उपनिरीक्षक राहूल महाजन, पोलीस कर्मचारी योगेड श्रीवास, हरिश बुंदेले, हरिश चौधरी, शशिकांत गवई जयेश परिवाले, रोशन वऱ्हाडे यांचा समावेश होता.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १८ जून २०२५

शहर/ग्रामिण

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची लढाई न्यायालयात

## बच्चू कडूंची हाय कोर्टात याचिका, गुरुवारी सुनावणी

### सहकार विभागाने केले होते अपात्र






**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे (एडीसीसी) अध्यक्ष बच्चू कडू यांनी त्यांच्या अध्यक्ष व संचालक पदाच्या अपात्रतेला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठात दाखल केली आहे. उद्या गुरुवार, १९ जून रोजी या याचिकेवर सुनावणी होणार आहे.तत्कालीन विभागीय सहनिबंधक चैतन्य नासरे यांच्या न्यायालयाने कडू यांना बँकेचे अध्यक्ष व संचालक या दोन्ही पदासाठी अपात्र ठरविले आहे. सोमवार, १६ जून रोजी हा निर्णय सार्वजनिक झाला. दरम्यान आज, मंगळवारी दुसऱ्याच दिवशी त्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याचे बच्चू कडू यांच्या वतीने बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी गेले आठवडाभर बच्चू कडू यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यभूमी असलेल्या गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन केले होते. त्यामुळे शनिवारी सायंकाळी उपोषण सोडताच त्यांना येथील रिम्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. अशाही स्थितीत सहनिबंधकांच्या आदेशाला आव्हान देणार असल्याचे बच्चू कडू यांनी सोमवारीच हॉस्पीटलमधून प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले होते.नाशिक येथे आंदोलनादरम्यान सरकारी कामकाजात अडथळा निर्माण केला म्हणून तेथील एमएलए-एमपी विशेष न्यायालयाने कडू यांना एक वर्षाची शिक्षा ठोठावली होती. नेमक्या याच शिक्षेचा आधार घेऊन विभागीय सहनिबंधकांनी बच्चू कडू यांना अपात्र ठरविले आहे. परंतु जाणकार सूत्रांच्या माहितीनुसार सदर शिक्षेला मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती शिवकुमार दीघे यांच्या एकलपिठाने ११ मार्च २०२५ रोजीच निलंबित केले आहे. नेमका हाच मुद्दा घेऊन कडू उच्च न्यायालयात गेले आहेत. युक्तिवादादरम्यान याशिवायही काही मुद्दे मांडले जातील, अशी सूत्रांची माहिती आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाचे न्यायमुर्ती पानसरे यांच्या एकलपिठासमोर ही सुनावणी होईल.

# ३० हजार रुपयांची लाच घेताना ग्रामसेवकाला पकडले



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती ९**

मंगल कार्यालयाचा थकीत कर माफ करतो, असे म्हणत त्यामोबदल्यात ३० हजार रुपयांची लाच घेणाऱ्या ग्राम सेवकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मंगळवारी अचलपूर येथील मोती मंगलकार्यालयजवळ अटक केली. अर्जुन शिवशंकरराव पवार (वय ४४ रा. महाकालीनगर, परतवाडा) असे लाचखोर ग्रामसेवकाचे नाव आहे. अर्जुन पवार अचलपूर तालुक्यातील वडनेर भुजंग ग्रामपंचायत येथे ग्रामसेवक आहे. तक्रारदाराचे सर्वज्ञ मंगलम नावाचे मंगल कार्यालय आहे. ज्या जागेवर मंगल कार्यालय आहे त्या जागेचा थकीत कर रक्कम भरण्याकरीता तक्रारदार यांना अचलपूर येथील राष्ट्रीय लोक अदालत कोर्टाची नोटी प्राप्त झाली होती. त्यामुळे ते कोर्टात हजर झाले होते. परंतु ग्रामसेवक हजर नव्हता त्यामुळे त्यांना कराची रक्कम भरता आली नाही. त्यामुळे त्यांनी १२ जुन रोजी बिलाची मागणी केली आणि ग्रामसेवक पवार यांना भेटले. ग्रामसेवकाने त्यांना सांगितले की, २०२० ते २०२५ या ६ वर्षाचा ग्रामपंचायत कर थकीत आहे. परंतु तुम्ही थकीत कर रक्कमे पैकी मागील दोन वर्षाचा थकीत कर भरा त्याची पावती तुम्हाला देतो. परंतु उरलेला ४ वर्षाचा थकीत कर रक्कम अंदाजे ८० हजार रुपये माफ करतो, त्या मोबदल्यात मला ३० हजार रुपये द्यावे लागतील. तेव्हा तक्रारदाराने होकार दिला आणि तेथून निघून आले. त्यानंतर त्यांनी १६ जुन रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला तक्रार दिली. त्या आधारावर संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करून मंगळवारी सकाळी अचलपूर येथील मोती मंगल कार्यालयाजवळ सापळा रचला.ठरल्याप्रमाणे ग्रामसेवक तक्रारदाराला भेटायला आला आणि त्याच्या जवळचे ३० हजार रुपये घेतले. त्याचवेळी अधिकाऱ्यांनी त्याला रंगेहात अटक करून अचलपूर पोलिसांच्या ताब्यात दिले. या कारवाईत पोलीस उपअधीक्षक मंगेश मोहोड, पोलीस निरीक्षक निलिमा सातव, पोलीस कर्मचारी राजेश मेटकर, वैभव जायले, आशिष जांभोळे, उपेंद्र थोरात, गोवर्धन नाईक आणि राजेश बहिरट यांचा समावेश होता.

# अमरावती महानगरपालिकेच्या नव्या आयुक्त सौम्या शर्मा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** : अमरावती महापालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे यांची पुणे येथील यशदाच्या उपसंचालक बदली झाली आहे. आता सौम्या शर्मा (चांडक) अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त म्हणून काम पाहणार आहेत,सौम्या शर्मा या २०१८ च्या महाराष्ट्र केडरच्या आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी नागपूर जिल्हा परिषदेच्या सीईओ म्हणून काम केले आहे. जिथे त्यांनीग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित केले होते. नागपूर स्मार्ट सिटीचे सीईओ म्हणून, त्यांनी शहराच्या विकासासाठी आणि स्मार्ट सोल्यूशन्ससाठी काम केले. त्या आयुक्तपदाचा पदभार लवकरच स्वीकारणार आहेत.

## सचिन कलंत्रे यांना यशदा, पुणेच्या उपसंचालकपदी बढती



# औद्योगिक क्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी पायाभूत सुविधा प्राधान्याने उभारा-विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

## विभागस्तरीय उद्योग समन्वय समितीची सभा संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती,** ६औद्योगिक क्षेत्राचा विकास अधिक जलद गतीने घडवून आणण्यासाठी त्याठिकाणी पायाभूत सुविधांचे सक्षम जाळे उभे करणे आवश्यक असते. अमरावती विभागातील सर्व एमआयडीसी, औद्योगिक क्षेत्रात नवीन उद्योग-व्यवसाय सुरु होण्यासाठी तसेच भरीव गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळण्यासाठी औद्योगिक क्षेत्राच्या ठिकाणी अखंडीत वीज पुरवठा, पाणी, रस्ते, स्ट्रीट लाईटस्, रुग्णालय व पोलीस चौकी अशा पायाभूत सुविधा प्राधान्याने उभारण्यात याव्यात, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी आज दिले.

येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली विभागस्तरीय समन्वय समितीची सभा (डिएलसीसी) आज झाली. त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अमरावती विभागाचे उद्योग सहसंचालक निलेश निकम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उपरचनाकार श्रीमती स्नेहा नंद यांच्यासह एमआयडीसी व उद्योग विभागाचे अधिकारी, ऊर्जा, पोलीस विभागाचे अधिकारी तसेच इंडस्ट्रीयल असोशिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर, पाचही जिल्ह्यांचे इंडस्ट्रीयल असोशिएशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी पाचही जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील सुरु असलेल्या उद्योग-व्यवसायाबाबत तसेच उद्योजकांच्या अडचणी व समस्यांबाबत सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक जिल्ह्यात मोठे, लघु व सुक्ष्म उद्योजकांना नवीन उद्योग उभारणीसाठी व उद्योग-व्यवसायाकरिता गुंतवणूक वाढविण्यासाठी सहाय्य करणे शासनाचे धोरण आहे. याअंतर्गत औद्योगिक क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने त्याठिकाणी प्रामुख्याने वीज, पाणी, रस्ते यासारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील कार्यान्वित असलेल्या उद्योग-व्यवसायांना अखंडीत वीज पुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी ऊर्जा विभागाने त्या परिसरात मागणीनुसार विद्युत सबस्टेशन उभारण्यासाठी प्रयत्न करावेत. सर्वच प्रकारच्या उद्योगांसाठी पाणी ही महत्वाची बाब आहे, त्याची पूर्तता करण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने तसेच एमआयडीसी प्रशासनाने समन्वयाने नियोजन करावे, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी केल्या.निर्यात धोरण २०२३, लॉजिस्टीक धोरण-२०२३, अमरावती औद्योगिक क्षेत्रातून होणाऱ्या निर्यातीबाबतच्या ठळक बाबी, निर्यात अनुकूल औद्योगिक विकास कार्यक्रम, निर्यातीसाठीचे प्रमुख उद्योग क्षेत्र, महाराष्ट्रा लॉजिस्टीक पॉलीसी, गुंववणूकीसाठीचे प्रमुख व्यवसाय-उद्योग, उद्योग उभारणीसाठी शासकीय योजना, अनुदान योजना आदी संदर्भात उद्योग सहसंचालक श्री. निकम यांनी उपस्थित उद्योजकांना सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली. श्रीमती नंद यांनी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारितील औद्योगिक क्षेत्र, भूखंड वितरण प्रक्रिया, कार्यान्वित उद्योगव्यवसाय, कारखाने, महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या विविध योजना व सुविधा, उद्योगासाठी लागणाऱ्या विविध अनुज्ञप्त्या तसेच प्रस्तावित औद्यागिक क्षेत्रांचा विकास आदी संदर्भात बैठकीत सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली.

# उड्डाणपुलाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी नागपुरी गेट चौकात 'चंदा मांगो' आंदोलन





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**-चित्रा चौक ते वालगाव रोड या उड्डाणपुलाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून निधीअभावी रखडलेले आहे. ते पुन्हा सुरू करण्यासाठी परिसरातील काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी देणगी आंदोलन केले.ही रक्कम देणगी स्वरूपात लोकांकडून रीतसर घेण्यात आली. जेणेकरून हे पैसे सरकार, प्रशासन आणि संबंधित कंत्राटदाराकडे सुपूर्द करता येतील आणि याद्वारे उड्डाणपुलाचे अर्धवट काम पुन्हा सुरू करता येईल.चित्रा चौकातून नागपुरी गेटमार्गे वालगाव रोडकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाचे बांधकाम गेल्या ७वर्षांपासून सुरू आहे. तरीही, काम अद्याप पूर्ण झालेले नाही. शहराच्या पश्चिम भागाला जोडणाऱ्या या मुख्य रस्त्यावरील कामामुळे नागरिक आणि परिसरातील व्यावसायिक मेटाकुटीला आले आहेत. उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य घोक्यात आले आहे. रहिवाशांनी या संदर्भात लोकप्रतिनिधींसमोर अनेकवेळा निदर्शने केली आहेत. अधिकाऱ्यांना निवेदने आणि आणि परिसरातील व्यावसायिक मेटाकुटीला आले आहेत. उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रहिवाशांनी या संदर्भात लोकप्रतिनिधींसमोर अनेकवेळा निदर्शने केली आहेत. अधिकाऱ्यांना निवेदने आणिविनंत्याही केलेल्या आहेत. परंतु अधिकारी आणि कंत्राटदार नेहमीच निधीअभावी हा मुद्दा उपस्थित करतात. यामुळे कंटाळून, परिसरातील काँग्रेस अधिकाऱ्यांनी नागपुरी गेट क्रॉसिंगवरील उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली.यावेळी नजीर खान बीके, हाजी रामुसेठ, डॉ. नावेद पटेल, रफू पत्रकार, नसीम खान, गुड्डू हमीद, रझीक शाह, सलीम बेग, फिरोज शाह, अफजल चौधरी, आकिब पहेलवान, मेराज पठाण, फिरोज खान, मुन्ना नवाब, असरार आलम, मुश्ताक कुरेशी, मुश्ताक कुरेशी, मुश्ताक कुरेशी, डॉ. साबीर खान, मुश्ताक कुरेशी, डॉ. डॉ. मतीन झाकीर, डॉ. आबिद, सय्यद रझीक हुसेन, सय्यद जावेद, निसार याच्या सह अनेक नागरिके उपस्थित होते.

# शालेय विद्यार्थ्यांची ऑटोरिक्षातून वाहतूक केल्यास खबरदार

## स्कूलबस व ऑटोचालकांची पोलिसांनी घेतली बैठक





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** – ालेय विद्यार्थ्यांची ऑटोरिक्षातून वाहतूक केल्यास संबंधित ऑटोरिक्षा चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, असे सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताडे यांनी मंगळवारी घेण्यात आलेल्या स्कुलबस व ऑटोरिक्षा चालकांच्या बैठकीत सांगितले.

शहरातील शाळा सुरु झाल्या असुन शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षा पाहता वाहतुक विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताडे यांनी शहरातील स्कुलबस व ऑटोरिक्षा चालकांची बैठक घेऊन काही विशेष सुचना दिल्या. ऑटोरिक्षामध्ये केवळ प्रवाशी वाहतुक करण्यात यावी. यापूढे ऑटोरिक्षामध्ये शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक केलेली दिसल्यास संबंधित ऑटोरिक्षा चालकावर कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. शहरातील स्कुलबस चालकांनी सर्व नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. स्कुल बस मध्येसुरक्षा कर्मचारी, वैद्यकीय टुल बॉक्स, आपात्कालिन खिडकी आदर्दी बाबी असणे गरजेचे आहे. तसेच स्कुलबसमध्ये लहान मुली असतात. बसमध्ये महिला काळजीवाहक गरजेचे आहे. अशा अनेक बाबींवर चर्चा करण्यात आली. बैठकीला सहाय्यक आयुक्त संजय खताडे यांच्यासह पोलीस निरीक्षक रिता उईके, ज्योती विल्हेकर, आरटीओ निरीक्षक शरद वाडेकर यांच्यासह स्कुलबस व ऑटोरिक्षा चालक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

### संपूर्ण महाराष्ट्रात ऑटोरिक्षासाठी कायदा केला पाहिजे केवळ अमरावतीतच का?



ऑटोरिक्षातून विद्यार्थ्यांच्या वाहतुकीवर बंदी घालणार शहर वाहतूक पोलिसांचा निर्णय बेकायदेशीर आहे. जास्तीत जास्त स्कूल बस या गब्बर फी वसुल करणाऱ्या शाळा संस्थाचालकांच्या मालकीच्या आहेत. त्यांच्या फायद्यासाठीच शहर पोलीस वाहतूक शाखेने हा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय आम्हाला मान्य नाही, असे ऑटोरिक्षा संघटनेचे अध्यक्ष नितीन मोहोड यांनी म्हटले आहे. गरीब पालकांचे पाल्य शाळेत कसे जातील, याचे विवरण शहर वाहतूक पोलिसांनी दिले पाहिजे. सद्यःस्थितीत स्कूल बसच्या अर्ध्या भाड्यामध्ये ऑटोरिक्षा चालक विद्यार्थ्यांची ने-आण करीत आहेत. पोलिसांना नागरिकांच्या जीविताची खरचं एवढी काळजी असेल तर त्यांनी जीवघेणी गावठी हातभट्टीची दारू, ढाब्यावरून विकली जाणारी अवैध दारू, पोलिसांच्या मेहरबानीने खुलेआम सुरू असलेले गुटखा विक्रीचे सर्व पानठेले, जुगार अड्डे बंद केले पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रात ऑटोरिक्षासाठी कायदा केला पाहिजे, केवळ अमरावतीसाठी नाही. ऑटोरिक्षा चालवून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या जिल्ह्यातील २५,००० ऑटोरिक्षा चालकांविरोधात पोलिसांनी असे तुघलकी पाऊल उचलू नये. ऑटोरिक्षाचालक मेहनतीने पैसा कमावतो, हरामाचा पैसा कमावत नाही. **– नितीन मोहोड,**

## अवैध रेती उत्खनन करण्याऱ्यांचा हेदोस

# ढाबा मालकावर प्राणघातक हल्ला करीत संपुर्ण ढाबा टाकला जाळून





**विदर्भ प्रजासत्ताक**
**बिजुधावडी धारणी २,३**

धारणी तालुक्यातील बिजुधावडी गावा नजीकच्या धाब्याचा मालकावर प्राणघातक हल्ला संपूर्ण ढाबा सिनेमा स्टाईल सारखा जाळुन राख झाला असल्याची घटना हदली आहे या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण आहे. या घटनेत ३०/४० लाखाचे नुकसान झाले असल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलीस सूत्रांच्या मिळालेल्या माहिती नुसार तु आमच्या रेती चोरुन विक्री करतात याची माहिती पोलिसांना व तहसीलदार यांना देतो या संशयामुळे गडगा मालुर च्या पाच भावांनी संपूर्ण परीवार ला मारण्याचा कट रचला मात्र सुदैवाने श्रीकांत जयस्वाल यांच्या कुटुंबीयांचे प्राण वाचले मात्र संपूर्ण संसार उद्धवस्त केले.

धारणी तालुक्यातील धारणी अकोट रोडवर असलेल्या विजू दावडी नजीक श्रीकांत जयस्वाल यांच्या धाब्यावर सोमवारी रात्री गडगामालूर येथील पाच जणांनी प्राण घातक हल्ला चढविला सुदैवाने श्रीकांत जयस्वाल हा धारणी काही का सामान आणण्याकरिता गेला होता म्हणून त्याचे प्राण वाचले मात्र गळगामालूर येथील रेती तस्कर व उत्तम पाटील,गजा पाटील,राजा पाटील पवन पाटील ,बाला पाटील , या पाच जणांनी धाब्यावर ऐउन श्रीकांत जयस्वाल च्या पत्नीला श्रीकांत कोठे गेला त्याला बोलाव असे म्हणत त्यांच्या पत्नी ला शिविगाळ व मारायला शुरुवात केली हे द्रुष्य पाहुन त्याचा सात वर्षांच्या मुलगा आई ला सोडून जंगलात आपले प्राण वाचवायला पळाला तो पर्यंत श्रीकांत धाब्यावर पोहोचलाच त्याला व त्याच्या पत्नीला मारहाण केली व समोर असलेली अर्टीका कार दोन मोटरसायकल, सायकली व चार डीफफ्रीजर सह संपूर्ण धाब्यावर पेट्रोल टाकून जाळुन दीले या आगीत संपूर्ण ढाबा व पैसे जळून राख झाले या मध्ये सुदैवाने श्रीकांतच्या कुटुंबातील व्यक्तींची जिवित हाणी टळली मात्र त्यांना जबरदस्त मारहाण करण्यात आली या वेळी उपस्थित सर्व ग्राहक आपल्या स्वतःच्या स्वसंरक्षणासाठी इकडे तीकडे पळाले त्या ठिकाणी दोन पोलीस कर्मचारी सुद्धा जेवन करण्यासाठी आले होते असे श्रीकांत जयस्वाल यांनी सांगितले धारणी पोलीस स्टेशन ला माहीती मीळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाल्या व कार्यवाही शुरु केली, तालुक्यातील बिजुधावडी गावा नजीकच्या धाब्याचा मालकावर प्राणघातक हल्ला संपूर्ण ढाबा सिनेमा स्टाईल सारखा जाळुन राख झाला असल्याची घटना हदली आहे या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण आहे.

# ग्रामपंचायत सभागृहात गाजला विजेचा मुद्दा

### अभियंता बेहरे व नागरिक आमने-सामने
### पंधरा दिवसांत सुधारणा करण्याचे आश्वासन

**वारंवार फोन करू नये– अभियंता बेहरे**

नांदगाव पेठ ३३ केव्ही लाईनवर सध्या भार खूप वाढलेला आहे, त्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. मात्र, त्याबाबत कार्यवाही सुरू आहे आणि मी स्वतः नांदगावपेठ बातमीपत्र व ग्रामवासी समूहावर नियमितपणे माहिती देत असल्याचे त्यांनी नमूद केले.लाईट गेल्यानंतर वारंवार फोन करू नये,कर्तव्यावर असताना फोन उचलता येत नाही, यासाठी त्यांनी उपस्थित नागरिकांची समजूत घातली आणि असुविधेबद्दल दिलगिरीही व्यक्त केली. शंभर टक्के प्रयत्न करून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी मी कटिबद्ध आहे असा शब्दही त्यांनी दिला.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नांदगाव पेठ**

महिनाभरापासून सुरू असलेल्या विजेच्या लपंडावामुळे त्रस्त झालेल्या गावकऱ्यांनी दोन दिवसांपासून वीज वितरण कार्यालयाला घेराव घालत अधिकाऱ्यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला मात्र अधिकारी जागेवर उपस्थित नसल्याने मंगळवारी ग्रामपंचायत सभागृहात महावितरणचे नांदगाव पेठ येथील अभियंता गजानन बेहरे यांना पाचारण करण्यात आले होते.यावेळी अभियंता आणि नागरिक यांच्यामध्ये तू तू मै मै झाल्यांनंतर ग्रामपंचायत प्रशासनाने मध्यस्थी करत तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना देत नागरिकांच्या समस्यांना प्राधान्य देण्याची विनंती यावेळी केली. या बैठकीत अभियंता बेहेरे यांनी स्पष्ट केले की, अनेकदा नैसर्गिक आपत्ती, लांब अंतरावरून होणारा वीजपुरवठा, इन्सुलेटर तुटणे अशा कारणांमुळे वीजपुरवठा खंडित होतो. नांदगाव पेठ मध्ये लालखडी व शिराळा येथून वीजपुरवठा असल्याने या दोन्ही भागांमध्ये वीज पुरवठा होत असतांना अनेक तांत्रिक अडचणी येतात मात्र येत्या पंधरा दिवसात सर्व अडचणी दूर करून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन यावेळी अभियंता बेहरे यांनी उपस्थितांना दिले. या बैठकीस तंटामुक्ती समिती अध्यक्ष संजय चौधरी, उपसरपंच मजहर खा, सफदर खा, ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे, सदस्य शिवराजसिंह राठोड, किशोर नागापुरे, छत्रपती फटके, वृषाली इंगळे, आशा चंदेल, विनोद डांगे, नितीन सत्रे, किशोर राऊत, शशी बैस, अमोल व्यवहारे यांची उपस्थिती होती.बैठकीत वीजपुरवठ्याबरोबरच पाण्याच्या समस्येबाबतही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले. यावेळी बेहरे यांनी कर्मचारी संख्या कमी आणि कामाचा ताण अधिक असल्याचे स्पष्ट करत ग्रामस्थांची सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

## बचत गट कर्जाच्या हिशोबात

# १.४ लाखाची हेरा-फेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**भातकुली तालुक्यातील हरतोटी येथील अंबा माता स्वयं-सहाय्यता बचतगटाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा खोलापूर येथून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीच्या रकमेपैकी तब्बल १ लाख ४ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बचतगटातील पदाधिकाऱ्यांच्या तक्रारीनंतर भातकुली पोलीस ठाण्यात संबंधित आरोपी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस तपास सुरू आहे.माहितीनुसार, अंबा माता महिला बचतगट, हरतोटी या बचतगटाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया, खोलापूर शाखेतून कर्ज घेतले होते. या कर्जाच्या परतफेडीसाठी पाच महिन्यांचीएकूण १ लाख ३५ हजार रुपये रक्कम बचतगटाच्या वतीने बँकेत भरण्यासाठी आरोपी महिलेकडे देण्यात आली होती. मात्र, आरोपी महिलेने विश्वासघात करून त्यातील केवळ ५४ हजार रुपये बँकेत भरले आणि उर्वरित ८१ हजार रुपयांची रक्कम स्वतःकडे ठेवून अफरातफर केली. इतकेच नव्हे तर तिने बचतगटाच्या खात्यातून खोट्या सह्या करून २३ हजार रुपये रोख स्वरूपात काढून घेतले. अशा प्रकारे एकूण १ लाख ४ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात तक्रारकर्त्यांनी लेखी तक्रार दिल्यानंतर प्राथमिक चौकशी करण्यात आली. पोलिसांनी आरोपी महिलेविरोधात भातकुली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत.

## खासदार बळवंत वानखडे यांच्या प्रयत्नांना यश

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जरीदा उपकेंद्रासाठी वनजमिनीच्या वळणाला मंजुरी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती.** खासदार बळवंत वानखडे यांच्या सतत पाठपुराव्याला यश मिळाले असून, मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून जरीदा उपकेंद्रासाठी ३३ केव्ही ट्रान्समिशन लाईन बांधण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेस केंद्र सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे.जरीदा गावातील उपकेंद्रासाठी आवश्यक असलेल्या वनजमिनीच्या वळणासाठी खासदार वानखडे यांनी २० फेब्रुवारी २०२५ रोजी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत, पर्यावरण, वन आणि हवामान मंत्रालयाने १२ मे २०२५ रोजी दिलेल्या पत्रानुसार ०.८९३५ हेक्टर राखीव वनजमिनीचे वळण करण्यास पूर्वलक्षी मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. या मंजुरीमुळे डीटीडीसी टीएसपी योजनेअंतर्गत ३३ केव्ही ट्रान्समिशन लाईन आणि उपकेंद्र बांधकामाचे मार्ग मोकळे झाले आहेत.याशिवाय, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडने अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमधील सिपना पश्चिम वन विभागातील जरीदा गावात विद्युतीकरणासाठी उपकेंद्र स्थापनेचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावामध्ये एकूण १.३४३ हेक्टर क्षेत्रफळ, त्यात ०.१ हेक्टर वनजमीन, १.१२३ हेक्टर गैर-वनजमीन, आणि ०.१२ हेक्टर इतर वनजमीनचा समावेश होता.हा प्रस्ताव १२ मार्च २०२५ रोजी माननीय पर्यावरण, वन आणि हवामान मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ८२ व्या स्थायी समितीच्या (डउ-छइथड) बैठकीत सादर करण्यात आला होता. या बैठकीत प्रस्तावास शिफारस करण्यात आली असून लवकरच अंतिम मंजुरी प्रक्रियेचा टप्पा पार होणार आहे.या निर्णयामुळे जरीदा व परिसरातील गावांमध्ये वीजपुरवठा सुलभ होणार असून अनेक वर्षांपासून वीजेच्या प्रतिक्षेत असलेल्या आदिवासी भागांना दिलासा मिळणार आहे.या उपक्रमामुळे स्थानिक विकास, शिक्षण, आरोग्य सुविधा आणि रोजगार निर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.खासदार बळवंत वानखडे यांचे पाठपुरावा, केंद्र सरकारशी सतत समन्वय व नियोजन या यशामागील महत्त्वाची कारणे ठरली आहेत.

# सात अधिकाऱ्यांची तालुका पालक अधिकारीपदी नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कामकाजात गती आणण्यासाठी, स्थानिक प्रशासनाला मदत करण्यासाठी आणि शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील सात अधिकाऱ्यांची तालुका पालक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर हे मोर्शी व वरुड, निवडणूक उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे दर्यापूर व अंजनगाव सुर्जी, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे अमरावती व नांदगाव खंडेश्वर, रोहयो उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर ज्ञार धारणी व चिखलदरा, महसूल उपजिल्हाधिकारी विवेक जाधव अचलपूर व चांदुर बाजार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रध्दा उदावंत भातकुली व तिवसा, विशेष भुसंपादन अधिकारी प्रसन्नजित चव्हाण चांदुर रेल्वे व धामणगाव रेल्वे तालुक्यांसाठी तालुका पालक म्हणून कार्य करतील.नियुक्त करण्यात आलेले अधिकारी तालुक्यातील महसूल, विकास, आपत्ती व्यवस्थापन, तसेच शासन योजनांच्या अंमलबजावणीवर नियमित देखरेख ठेवातील. तसेच, तालुकास्तरीय कार्यवाहीचा आढावा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाला मासिक अहवाल सादर करतील. सदर अधिकारी नियुक्त तालुक्यात किमान १५ दिवसांतून एकदा शक्यतो बुधवारी भेट देतील. तसेच संजय गांधी निराधार योजनेत लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी, ग्रीस्टॅक नोंदणी, आधार प्रमाणिकरण, घरकुल आदी योजनांच्या अंमलबजावणीबाबत तालुका पालक कार्य करतील. यासोबतच तालुकास्तरीय यंत्रणांची बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेतील.

# बार्टीचे सात विद्यार्थी केंद्राच्या असिस्टंट कमांडट पदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर ५१**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीतर्फे घेण्यात येत असलेल्या युपीएससी नागरी सेवा पूर्व तथा मुख्य परीक्षेचे पूर्वतयारी प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व चाचणी आर्थिक सहाय्य या योजनेअंतर्गत केंद्रीय सशस्त्र पोलीस दल २०२४ साठी बार्टीच्या सात विद्यार्थ्यांची असिस्टंट कमांडट पदी निवड करण्यात आली आहे. ऑगस्ट अखेरपर्यंत त्यांचे हैद्राबाद येथे केंद्रीय सशस्त्र पोलीस दलासाठी प्रशिक्षण सुरु होणार आहे.

बार्टीच्या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये भुवनेश कांबळे ( रँक १९४), श्रेयस बसर्गे (रँक २७५), निखील वसईकर (रँक ३२७), हिमांशू मून ( रँक ३६२), अनिकेत ठमके ( रँक ३९०), श्रीनाथ सातपुते (रँक) ४००, रोहित मोगले (रँक ४१२) या गुणवंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीत बार्टीमुळे असिस्टंट कमांडट बनण्याचे स्वप्न साकार झाल्याचे मनोगत व्यक्त केले.

युपीएससीद्वारा आयोजित केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (असिस्टंट कमांडट) परीक्षेमार्फत सीएपीएफ मध्ये अधिकाऱ्यांची भरती केली जाते. बार्टी मार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी यु.पी.एस.सी.-नागरी सेवा पूर्व तथा मुख्य परीक्षेचे पूर्वतयारी प्रशिक्षण योजने अंतर्गत पुर्व तसेच मुख्य परीक्षेचे प्रशिक्षणासह व्यक्तिमत्त्व चाचणी प्रशिक्षण दिल्या जाते. प्रशिक्षण योजनेत विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेच्या आधारावर केली जाते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मासिक विद्यावेतन, मोफत प्रशिक्षण, प्रवास भत्ता दिल्या जातो.

# उघडे वीज रोहित्र देत आहे अपघाताला आमंत्रण : नागरिकांच्या जीवितास धोका

## वीज वितरण कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मोर्शी : ३८**

शहरातील अनेक भागात असलेले विजेचे रोहित्र उघडे असल्यामुळे मोकाट जनावरांसह नागरिकांच्या जिवास धोका निर्माण झाला आहे. या गंभीर बाबीकडे वीज कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

महावितरणच्या मुख्य केंद्रातून येणारा वीजप्रवाह अतिउच्च दाबाचा असतो. तो थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवला जात नाही. ग्राहक आणि उच्च दाब यांच्यातील मुख्य दुवा म्हणजे रोहित्र. या रोहित्रांची योग्य देखरेखीचे काम 'महावितरण'कडे असतेः परंतु याकडे दुर्लक्ष होत आहे.शहरातील बहुतांश रोहित्र रस्त्याच्या बाजूलाच आहेत. अनेक रोहित्रांचे गेट लावलेच नाही. पावसाळ्यापूर्वी वीज वितरण कंपनीकडून शहरातील झाडाच्या फांद्या वीज ताराला अडचण ठरत असल्याने कापल्या आहे. त्याचबरोबर वीज तारसुद्धा व्यवस्थित केले आहे.काही



प्रमाणात वीज रोहित्रांचे दरवाजे बंद केले होतेः परंतु काही महिन्यातच परिस्थिती जैसे थे झाली व आज शहरातील वर्दळीच्या ठिकाणावरील विजेचे रोहित्रांच्या पट्ट्या उघड्या आहेत. रोहित्र जमिनीपासून अगदी काही फुटावर बसविण्यात आले असल्याने वत्या ठिकाणी गुरेढोरे तसेच प्लस्टिक लोखंड वेचणारे गरीब मुले व नागरिक त्या जवळ जात असल्याने व यात जिवंत वीजतारा असल्याने एखादेवेळी अनुचित घटना घडू शकते.कित्येक ठिकाणी बसविलेल्या रोहित्रांसमोर धोका फलकही लावण्यात आले नाहीत. रस्त्यावरील वीजखांबालगत धोकादायक वायरिंग, उघड्या डीपी, तसेच पथदिव्यांच्या खांबावर सर्रासपणे जाहिरातीच्या होर्डिंग लावण्यात आल्याचेही दिसून येते.रोहित्रांना दरवाजा लावणे, देखभाल, दुरुस्तीची जबाबदारी वीज कंपनीवर आहे; मात्र, याविषयी कुठलेही गांभीर्य दिसत नसून, डेंजर झोन ठरणारी रोहित्रांची स्थिती शहरात भयानक आहे.वीज रोहित्रांवर 'डेजर (धोका) असे लिहिलेले असणे आवश्यक आहे. दरवाजा बंद करून त्यावर धोक्याची सवित्र सूचना देणेसुद्धा गरजेचे आहेः परंतु यातील दरवाजेच उघडे असल्याने हे रोहित्र अपघातांना आमंत्रण देऊ शकते. त्याचबरोबर रोहित्रांवरील सूचनांची पूर्णतः वाट लागली आहे. अनेक ठिकाणच्या रोहित्रांवर विविध प्रकारच्या जाहिरातीचे फलक चिकटविण्यात येतात. रस्त्यावरील रोहित्राजवळ परिसरातील कोणीही किरकोळ सामान ठेवू शकतो. एवढेच नव्हे तर रोहित्राजवळ नकळत वाहन लावणे, गुरे फिरणे तसेच नागरिकांचा वावर असे प्रकार सर्रास दिसतात. रस्त्याच्या कडेला मुलं खेळत असतात. गवत, वेलांचा विळखा वाढत आहे. अशा स्थितीत शहरातील हे धोकादायक रोहित्रे असून याची व्यवस्थित तपासणी करून शहरातल्या रोहित्रांचे दरवाजे पूर्णतः बंद करण्याची मागणी नागरिक करीत आहे.

# शिंदेंचा घाव, ठाकरेंच्या शिवसेनेला पडलं भगदाड : उरले फक्त नऊ माजी नगरसेवक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नाशिक**

नाशिक मधील राजकारणाच्या दृष्टीने मंगळवारी महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. एकाच वेळी अनेक माजी नगरसेवकांनी ठाकरेंची साथ सोडून भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेला मोठे भगदाड पडले. २०१७ मध्ये ३३ नगरसेवक निवडून आणलेल्या ठाकरेंकडे आता ९ माजी नगरसेवक शिल्लक असून, निवडणुकीपर्यंत त्यातील किती राहतील, असाही प्रश्न आता चर्चिला जात आहे.

राजकीय घडामोडींनी मंगळवारचा (१७ जून) दिवस गाजला. एकीकडे भाजपात एक डझन माजी नगरसेवकांनी प्रवेश केला असताना दुसरीकडे शिंदेसेनेतही इनकमिंग झाले.

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या माजी नगरसेविका किरण बाळा दराडे-गामणे, सीमा गोकुळ निगळ, यांच्यासह माजी नगरसेवक पुजाराम गामणे, पुंडलिक अरिंगळे यांनी शेकडो पदाधिकाऱ्यांसोबत शिंदेसेनेत प्रवेश केला.

# पालखी सोहळ्यासाठी साडेतीन हजार पोलिसांचा बंदोबस्त; देहू आणि आळंदीत मोठा फौजफाटा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ पिंपरी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांची आषाढी वारी सुरक्षित आणि सुशोभित करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने मोठ्या बंदोबस्ताची तयारी केली आहे. साडेतीन हजार पोलिसांचा फौजफाटा राहणार आहे.

देहू येथून बुधवारी (दि. १८) संत तुकाराम महाराज पालखी, तर आळंदी येथून गुरुवारी (दि. १९) संत ज्ञानेश्वर महाराज पालखी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. दोन्ही दिवशी पालखी मार्गावरील वाहतूक, पार्किंग, गर्दी नियंत्रण, वारकऱ्यांची सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने मोठ्या फौजफाट्यासह बंदोबस्त आखला असून त्यामध्ये पोलिस सहआयुक्त, अपर आयुक्त, सहा उपायुक्त, ११ सहायक आयुक्त, ६१ निरीक्षक, १७२ उपनिरीक्षक, २६३४ अंमलदार, ८०० होमगार्ड, तीन एसआरपीएफ कंपनी, चार बीडीडीएस पथक, तीन रॅपिड कंट्रोल पथक (आसीपी), १२ स्ट्रायकिंग फोर्स यांचा समावेश असणार आहे. देहू आणि आळंदी येथे तसेच पालखी मार्गावर ठिकठिकाणी टेहळणी मनोरे उभारले आहेत. त्यावरून सोहळ्यावर 'वॉच' ठेवण्यात येणार आहे.

**साध्या आणि वारकऱ्यांच्या वेशातील पोलिस**

चोरीच्या घटना घडू नयेत म्हणून गर्दीमध्ये साध्या वेशातील आणि वारकऱ्यांच्या वेशातही पोलिस वारीत सहभागी होणार आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजरही असणार आहे.

**सोनसाखळी चोर, पाकीटमार रडारवर**

परराज्यातील तसेच परजिल्ह्यातून सराईत सोनसाखळी चोर तसेच पाकीटमार वारीत येतात. अशा चोरट्यांची माहिती संकलित करण्यात आली आहे. राज्यभरातील पोलिसांची त्यासाठी मदत घेण्यात आली आहे. त्यामुळे अशा चोरट्यांची ओळख पटवणे सहज शक्य होत असून, त्यांच्यावर 'वॉच' राहणार आहे.

# एचटीबीटीसह कापसाच्या बोगस बियाण्यांची विक्री तस्करीने आणलेली रिकामी पाकिटे व बियाण्यांचा कंपन्यांकडून वापर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**



तस्करीच्या बियाण्यांसोबत विविध वाणांच्या नावे छापील रिकाम्या पाकिटातून कापसाच्या बोगस बियाण्यांची विक्री मोठ्या प्रमाणावर झाली आहे. त्यामुळे अनेक भागांत पेरणीनंतर बियाणे न उगवण्याची शक्यता अधिक आहे. तथापि या बियाण्यांसोबत शेतकरी कंपनीचेही बियाणे पेरत असल्याने संभाव्य आक्षेपांची धास्ती उत्पादक कंपनी व विक्रेत्यांनी घेतली आहे.

अमरावती जिल्ह्यात यंदा अडीच लाख हेक्टर क्षेत्रात कापसाची पेरणी अंदाजित करण्यात आली आहे. बियाणे बाजारात सर्वच नामांकित कंपनीचे वाण उपलब्ध असले गरी विशिष्ट वाण वगळता इतर वाणांना मागणी कमी असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील सत्तर टक्के क्षेत्रात चोरबोटांची पेरणी होऊ लागली आहे. तस्करीने हे बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले आहे. कृषीविभागाने कारवाई करीत ४३ लाख रुपये किंमतीचे ४ हजार २४१ पाकिटे जात केली आहेत. यासोबतब भरारी पथकाला रिकामी छापील पाकिटे सापडली आहेत. ही पाकिटे नेमकी कुठे बनलीत व त्याचा वापर कुठे कुठे केल्या गेला, हे अद्याप समोर आलेले नाही. तथापि कृषी केंद्रांमधून यंदा तगनाशक व बियाण्यांना लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या औषधांची विक्री मोठ्या प्रमाणावर झाली आहे. किडा लागू नये, यासाठी या औषधांची मागणी केल्या जाते. १० ते २० लिटर औपथ मागण्यात आल्याने ही मागणी संशयास्पद असून रिकाम्या पाकिटांतून बोगस बियाण्यांची औषध लावून विक्री केल्या गेली आहे.चोरबीटीसोबत कंपनीच्या वाणांची खरेदी शेतकऱ्यांनी केली आहे. दरवर्षीपेक्षा या मागणीत घट झाल्याचे दिसून आले आहे. चोरबीटी किंवा बोगस विपाण्यांसोबत खरेदी करण्यात आलेल्या वाणांची पेरणी केल्या जात आहे. बोगस बियाणे न उगवल्यास त्याचा थेट आक्षेप कंपनीच्या वाणांवर येण्याची शक्यता आहे. याचीच उत्पादक कंपनी व कृषी बियाणे विक्रेत्यांनी मात्र चांगलीच धास्ती घेतली आहे.

**शेतकऱ्यांनी पेरणी केल्यानंतर ते बियाणे**

उगवले नाही तर त्याचा थेट आक्षेप विक्रेत्यांनी विकलेल्या कंपनीच्या वाणांवर येण्याची भीती आहे. कृषी विभाग व यंत्रणा शेतकऱ्यांनी घेतलेले आक्षेप ग्राह्य मानते. त्यामुळे उत्पादक कंपनी व विक्रेते अडचणीत येण्याची शक्यता आहे.-प्रवीण उंबरकर, गायत्री कृषिसेवा केंद्र

**रिकामे पाकीट व बोगस बियाण्यांचा सुळसुळाट**

तस्करीच्या एचटीबीटी बियाण्यासोबत छापील रिकामी पाकिट आल्याने त्यामध्ये बोगस बियाणे भरून विक्री झाली असल्याची भीती वर्तविण्यात आली आहे. एचटीबीटीच्या नावाखाली ही विक्री मोठ्या प्रमाणावर झाली आहे. कृषी विभागाने केलेल्या कारवाईत एवाटीबीटीच्या पाकिटांसह पोत्यातूनही खुले बियाणे जप्त करण्यात आले आहे. याचाच अर्थ रिकाम्या पाकिटांत बोगस विवाणे भरून विक्री झाली असून त्याच्या उगवणक्षमतेबद्दल संशय आहे.

# आ. गजानन लवटे यांच्या हस्ते घरकुल लाभार्थ्यांना रेती वाटप सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अंजनगाव सुर्जी**

महाराष्ट्र शासनाकडून घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती रॉयल्टी पास देण्याचा आदेश महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढला होता. त्यानुसार १६ जूनला तालुक्यातील गावडगाव येथ्रील रेतीघाटावर मह सूल विभागामार्फत मोफत रेती रॉयल्टी पास वाटपाचा शुभारंभ अंजनगाव दर्यापूर मतदारसंघाचे आ. गजानन लवटे व तहसीलदार पुष्पाताई सोळंके यांच्याहस्ते करण्यात आला. शुभारंभाव्या वेळी एकूण ७० लाभार्थ्यांपैकी पाच लाभार्थ्यांना

रेतीवाटप करण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी कल्पना करसकर, तलाठी नंदकिशोर सोळंके, शिवसेना तालुकाप्रमुख कपिल देशमुख, सामाजिक कार्यकर्ते रमेश सावळे, प्रतीक हरणे, शिवा ढोले, अनिकेत खाडे, आशिष देशमुख, अनिकेत चिकटे तसेच महसूल विभागाचे कर्मचारी व गावाचे नागरिक उपस्थित होते.महसूल मंत्री बावनकुळे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील इतर तालुक्यात मोफत घरकुल लाभार्थ्यांना रेती रॉयल्टी पासचे वाटप झाले होते; परंतु अंजनगाव सुर्जी तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेतीचे वाटप झाले नसल्याने सामाजिक कार्यकर्ते रमेश सावळे यांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे वारंवार मागणी केली होती.

# लोणच्याची कैरी ४० वरून ७० रुपये किलोवर: खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



दररोजच्या जेवणाची लज्जत वाढण्यासाठी कैरीच्या लोणच्याला विशेष पसंती दिली जाते. हे लोणचे वर्षभर तोंडाची चव राखण्याचे काम करते. तसेच जून महिन्यात बनवलेले आंब्याचे लोणचे वर्षभर टिकते. मसाले, तेल घालून तिखट आंबट चवीचे तर मसाले व गुळ घालून आंबटगोड चवीचे लोणचे सध्या गृहिणी बनवून ठेवत आहेत. एक किलोपासून ते पाच किलोपर्यंत हिरव्या पाठीचे व आतून पांढरा गर असलेले आंबे खरेदी करून नंतर ते स्वच्छ धुतले जातात. त्यानंतर ज्यांना ज्या आकाराच्या फोडी हव्या असतील तसे आंबे २० ते २५ रु. किलो दराने फोडून घेतले जात आहेत. गतवर्षीच्या तुलनेत यंदा कैरीचा भाव ४० रुपयांनी वाढला आहे. तरीही लोणच्याचे आंबे खरेदीस महिलांची गर्दी होत आहे.

आंब्याच्या फोडी मोठ्या भांड्यात टाकून त्यांवर मोठ्या प्रमाणात मीठ घातले जाते. त्यानंतर हळद घालून त्या चांगल्या ढवळल्या जातात. यामुळे मग आंब्याच्या फोडींना पाणी सुटते. तसेच त्यांच्या मीठ व हळद मुरते. ५ दिवस या फोडी तशाच ठेवल्या जातात. त्यानंतर आंब्याच्या फोडींच्या वजनानुसार तेल गरम करून त्या तेलाला हिंग, जिऱ्यासह मोहरीच्या डाळीची फोडणी दिली जाते. विविध ब्रॅण्डचा लोणचे मसाला वापरला जातो. चिनी माती किंवा काचेच्या बरणीत हे लोणचे ठेवले जाते. ते वर्षभर टिकावे म्हणून त्यात तेल व मिठाचा वापर जास्त केला जातो.

यंदाच्या वर्षी कैरी, तेल आणि मसाल्याच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्याने घरगुती लोणचे बनवायला दुप्पट खर्च येत आहे. तरीही गृहिणी लोचणे तयार करून ठेवत आहेत. यंदाच्या वर्षी कैरीच्या किंमतीत वाढ झाली आहे. गत वर्षी ४० रुपये किलो मिळणाऱ्या कैरीला यावर्षी ७० रुपये किलोसाठी मोजावे लागत आहे. तसेच, तेलाच्या आणि मसाल्याच्या किंमती देखील मोठ्या प्रमाणात वाढल्याने यंदा घरगुती लोणचं बनवण्यासाठी दुप्पट खर्च येत आहे.

**लोणच्याचा बीपी, शुगरच्या रुग्णांनी जपूनच स्वाद घ्या**

टिकाऊपणा व चव वाढवण्यासाठी लोणच्यात तेल, मीठ, मसाल्यांचा वापर हा जास्त प्रमाणात केला जातो. त्यामुळे ज्यांना उच्च रक्तदाब, हृदयाचे रोग तसेच मधुमेह यासारखे आजार आहेत, त्यांनी लोणच्याचा मर्यादित प्रमाणात आहारात समावेश करावा, असा सल्ला आहारतज्ज्ञांनी दिला.

# महाराष्ट्रातील ३० मेडिकल कॉलेजमधील 'एमबीबीएस' जागा संकटात

## 'एनएमसी'कडून गंभीर त्रुटींची नोंद : मेयोसह अनेक महाविद्यालये चौकशीच्या फेऱ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**



महाराष्ट्रातील एकूण ३० शासकीय वैद्यकीयमहाविद्यालये आणि त्यांच्या एमबीबीएसच्या जागांवर राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून (एनएमसी) संकटाची टांगती तलवार आहे. या महाविद्यालयांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण त्रुटी आढळल्याने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी एमबीबीएसच्या जागांच्या वार्षिक नूतनीकरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'एनएमसी'ने या गंभीर बाबीची दखल घेत, बुधवारी (दि. १८) यावर सुनावणी ठेवली आहे.

एनएमसी'च्या पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण मंडळाने राज्याच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे मूल्यांकन केले होते. हे मूल्यांकन महाविद्यालयांनी सादर केलेली स्व-प्रमाणित घोषणा पत्र, आधार-सक्षम बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीतील प्राध्यापकांची उपस्थिती, क्लिनिकल मापदंड आणि पायाभूत सुविधा यावर आधारित होते. मात्र, अनेक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विविध मापदंडांवर गंभीर त्रुटी आढळल्या. महत्त्वाचे म्हणजे, निदर्शनास आणलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी संस्थांकडून कोणतेही प्रयत्न झाले नसल्याचे निरीक्षणही 'एनएमसी'ने नोंदवले आहे, तसे पत्र १३ जून रोजी सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना पाठविण्यात आले आहे.

**या महाविद्यालयांमधील एमबीबीएसच्या जागा धोक्यात**

विदर्भातील आठ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसोबतच डॉ. वैशंपायन मेमोरियल मेडिकल कॉलेज, सोलापूरसह बारामती, अंबरनाथ, रत्नागिरी, उस्मानाबाद, सातारा, मुंबई, बुलढाणा, जालना, वाशिम, अलिबाग, हिंगोली, जळगाव, मिरज, नंदुरबार, परभणी, सिंधुदुर्ग, राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे, आई फोर्सेस मेडिकल कॉलेज, पुणे, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड व लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज, सायन, मुंबई येथील एमबीबीएसच्या जागा धोक्यात आल्या आहेत.

# नि:शुल्क नेत्र शस्त्रक्रिया, उपचार शिबिरात ६५० जणांची तपासणी आशा चॅरिटेबल ट्रस्ट आणि भाजपतर्फे शिबिराचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८शे.घाट**



आशा चॅरिटेबल ट्रस्टद्वारा आतापर्यंत एकूण २१ हजार रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली आहे. त्यातील ७ हजार ५०० रुग्णांवर यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया पार पडली आहे. वृद्ध नागरिकांना दृष्टी प्राप्त व्हावी. त्यांना संपूर्ण विश्व आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहायला मिळावे, हा त्यामागील सामाजिक उद्देश आहे. हा सामाजिक उद्देश डोळ्यासमोर ठेवून आशा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून हा उपक्रम आ. चंदू यावलकर यांच्या नेतृत्वात भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते, महात्मा आय बँक न्ड आय हॉस्पिटल नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वरुड मोर्शी मतदारसंघात सुरू आहे. वरुड येथून जवळच असलेल्या राजुरा बाजार येथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत नेत्ररोग तपासणी, औषधोपचार, चष्मे वाटप, मोतीबिंदू निःशुल्क नेत्र शस्त्रक्रिया तसेच इतर आरोग्य तपासणी शिबिर सोमवारी जि. प. सांस्कृतिक भवनात घेण्यात आले.

या वेळी ६५० रुग्णांची तपासणी करण्यात आली. २३ व २५ जून रोजी यातील एकुण १२० रुग्णांवर शस्त्रक्रिया पार पडणार आहे. या शिबिराला राजुरा बाजार, चिंचरगव्हाण, वाडेगाव, गाडेगाव व इतर परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. निवड झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले. या उपक्रमात भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आशा चॅरिटेबल ट्रस्टचे प्रतिनिधी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. हे आरोग्य शिबिर राजुरा बाजार व इतर परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त आणि लाभदायक ठरले आहे.

# मान्सूनच्या आगमनात ४५५ हेक्टरचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अंजनगाव सुर्जी**

गेल्या तीन दिवसांत जिल्ह्यातझालेल्या पथकाने ४५५ हेक्टर क्षेत्रातील आंबा व केळी पिकांचे नुकसान झाले आहे, तर ४१ घरांची अंशतः पडझड झाली. तीन मोठे पशू दगावलेत. तथापि या पावसाने खरीप हंगामास चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.१३ जूनपासून पावसाने जिल्ह्यातील काही भागांत हजेरी लावली आहे. सरासरी ३.१ मिमी पाऊस शुक्रवारी झाला असून वादळवारा व विजांच्या कडकडाटात झालेल्या पावसाने अंजनगावसुर्जी आणि अचलपूर तालुक्यातील अनुक्रमे एक व नऊ गावांना तडाखा बसला. अचलपूरमधील आठ गावातील ३१५ हेक्टरवरील केळीबागा व आंबा फळांचे नुकसान झाले.अंजनगावातील आंब्याची चार झाडे कोसळली असून अचलपूर तालुक्यातील आठ गावातील केळी व संत्राबागांचे नुकसान झाले आहे.यात दोन घरांची अंशतः पडझड झाली. शनिवारी झालेल्या पावसाने भातकुली तालुक्यातील दोन गावांतील चार घरांचे अंशतः नुकसान झाले व अंजनगावसुर्जी तालुक्यातील आठ हेक्टरवरील आंबा व संत्र्यांचे नुकसान झाले.रविवारी अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ९० व अचलपूरमधील ४२ हेक्टर क्षेत्राला पावसाचा फटका बसला. नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्यात येत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी सांगितले.

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यात तीन महिन्यांचे रेशन वाटप सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नांदगाव खंडेश्वर**



पावसाळा अगदी जवळच आला असताना नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील नागरिकांसाठी पुरवठा विभागाने पूरबाधित गावांना प्राधान्याने तीन महिन्यांचे रेशन वाटप सुरू केले आहे. त्यामुळे रेशनधारकांना दिलासा मिळाला आहे. शासनाच्या निर्देशानुसार जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्यांचे रेशन एकत्रितपणे जून महिन्यातच देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये धान्य पोहोचवण्याचे आणि वाटपाचे काम सुरू करण्यात आले आहे.

पुरामुळे दरवर्षी बाधित होणाऱ्या गावांमध्ये रेशन पुरवठा वेळेवर व्हावा, यासाठी शासनाकडून ही विशेष योजना राबवली जात आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यात एकूण १५६ गावे नदीकाठावर आहेत. त्यातील ३० ते ३५ गावे दरवर्षी पूरस्थितीचा सामना करतात. अशा वेळी रस्ते बंद होऊन मुख्यालयाशी संपर्क तुटतो. त्यामुळे नागरिकांना आठवडाभर गावातच अडकून पडावे लागते. धान्याचा तुटवडा भासू नये म्हणून तीन महिन्यांचे रेशन आगाऊ देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

या योजनेनुसार सर्वप्रथम पूरप्रवण गावांमध्ये रेशन पोहोचवले जात आहे. अनेक गावांमध्ये आधीच धान्य पोहोचवले गेले असून काही ठिकाणी रेशन वाटपाची प्रक्रियाही सुरू झाली आहे. लाभार्थ्यांनी आपले तीन महिन्यांचे रेशन ३० जूनच्या आत घेऊन जावे. मुदतीनंतर रेशन मिळणार नाही.

> प्रशासनाकडून आवाहन तालुक्यातील सर्व पात्र रेशन लाभार्थ्यांनी आपले रेशन तारखेपुर्वी घेऊन जावे. पुढील आपत्तीपासून स्वतःची व कुटुंबाची सुरक्षितता सुनिश्चित करावी. तसेच योग्य ती खबदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.
>
> **– शितल राठोड, पुरवठा निरीक्षण अधिकारी**

# अखेर अचलपुरात शासकीय ज्वारी खरेदीचा मुहूर्त ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अचलपूर**

शासनाने शासकीय ज्वारी खरेदीसाठी दिवसांची मुदत संपण्यासाठी १५ दिवसाचा कालावधी उरला असतानाच अचलपुरात ज्वारी खरेदीया मुहूर्त ठरला आ. प्रवीण तायडे हे या ज्वारी खरेदीचा शुभारंभ करण्यासाठी उपस्थित राहणार असून मुहूर्तावर ज्वारी आणणाच्या शेतकयाचा ते सन्मान करणार आहे उल्लेखनीय म्हणजे ज्वारी खरेदीची मुदत आगामी ३० रोजी संपणार आहे.३ हजार ३७१ या हमीभाव प्रमाणे शासन शेतकऱ्यांची ज्वारी खरेदी करणार आहे. सदरची ज्वारी खरेदी करता यावी म्हणून ऑनलाईन पोर्टलद्वारे शेतकऱ्यांच्या संबंधाने नोदणी करण्यात आली आहे सोमवारपर्यंत केवळ २३९ शेतकयांची पोर्टलवर नोदणी एकूण खरेदी-विक्री संस्थेकडे नोदणीकरिता तब्बल १ हजार २०० अर्ज प्राप्त झाले आहे. अजूनही १ हजार शेतकऱ्याची नोंदणी प्रतीक्षेत आहे. उल्लेखनीय म्हणजे पोर्टल नोंदणीसाठी १५ जून ही अतिम तारीख होती; मात्र अंतिम तारखेपूर्वीच पोर्टल बंद करण्यात आल्याने आणि जेवढे दिवस पोर्टल सुरू होते तेवढे दिवस साईट बंद असल्याने सर्व अर्ज नोंदणी करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे शक्य झाले नाही उल्लेखनीय म्हणजे ज्वारी खरेदीसाठी शासनाने दोन

महिन्यांची मुदत दिली आहे दीड महिना पूर्ण झाला तरी तालुक्यात शासकीय ज्वारी खरेदी करण्याचा मुहूर्त निघाला नाही. १५ दिवस शिल्लक असतानाच ज्वारी खरेदीचा मुहूर्त निघाला आहे.गोदाम उपलब्ध नाही, या कारणामुळे तहसील प्रशासनाने खरेदीसाठी हिरवी झेंडी दाखवली नाहीः मात्र ज्वारी खरेदीसाठी शेतकऱ्याऱ्यांचा रेटा वाढल्याने शेवटी शासकीय गोदामामध्ये ज्वारी खरेदीचा निर्णय घेण्यात आला, तसेच तहसील प्रशासनाने सोमवारी ज्वारी खरेदी करावी, यासाठी खरेदी-विक्री सस्थेला पत्र दिले.

# हिंदी भाषा अनिवार्यतेच्या शासन निर्णयावर चौफेर टीका, चळवळीतर्फे निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

शालेय शिक्षण मंत्र्यांनी व मुख्यमंत्र्यांनी हिंदी सक्तीला राज्यभरातून झालेल्या तीव्र विरोधानंतर हिंदी सक्तीला तोंडी स्थगिती दिली, शालेय शिक्षण मंत्री यांनी हिंदीसह कोणतीही तिसरी भाषा सक्तीची नसेल हे जाहीर केले, तेव्हापासून तशा शब्दात संबंधित शासन निर्णय काढण्याची मागणी करण्यात येत होती. मात्र, शासनाने आता काढलेल्या निर्णयात हिंदी सक्तीसह तिसरी भारतीय भाषा तशीच




राहील अशी सोय करत, राज्याचा ज्या हिंदीसह तिसऱ्या भाषा सक्तीला विरोध आहे, त्याकडे संपूर्ण डोळेझाक करून शासन, प्रशासनाने आपलाच हेका रेटून धरला आहे, अशी टीका मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीतर्फे करण्यात आला आहे. चळवळीने शासन निर्णयाचा तीव्र निषेध केला आहे.

शासनाने हा निर्णय देखील तातडीने दुरुस्त करावा आणि महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ, भाषा अभ्यासक, बाल मानसशास्त्रज्ञ, सत्तेतील सोडून अन्य सर्व राजकीय पक्ष हिंदीसह कोणतीही तिसरी भाषा अनिवार्य नको, ही जी मागणी एकमुखाने करत आहेत ती पूर्ण करावी व हिंदीसह कोणतीही तिसरी भाषा पहिली ते पाचवी साठी अनिवार्य असणार नाही, अशा नि:संदिग्ध शब्दातला शासन निर्णय निर्गमित करावा, अशी मागणी मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीतर्फे प्रमुख संयोजक डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, मराठी भाषा मंत्री यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे. शासनाने तोंडी एक सांगणे व शासन निर्णयात आपलाच हेका कायम राखणे ही एका अर्थाने राज्याची फसवणूकच असल्याचे व सरकार आपली विश्वासार्हताच गमावत असल्याचे पत्रात म्हटले आहे.

# ऐकावं तर नवलचं...! मेळघाटात शंभरावर बालमृत्यूच्या तक्रारीची सात वर्षांनंतर दखल

## राज्य मानवी हक्क आयोगाकडे १ जुलै रोजी होणार अंतिम सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ मेळघाट**

मेळघाटात शंभरावर बालमृत्यूच्या संदर्भात २ ऑगस्ट २०१८ रोजी करण्यात आलेल्या तक्रारीची दखल राज्य मानवी हक्क आयोगाने तब्बल सात वर्षांनंतर घेतली आहे. आता १ जुलै २०२५ रोजी या प्रकरणी अंतिम सुनावणी होणार असल्याबाबतचे पत्र जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाले असून जिल्हा महिला व बालकल्याण विकास अधिकाऱ्यांना सुनावणीसाठी हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे तक्रारीनंतर तब्बल सात वर्षे न्यायासाठी प्रतीक्षा करावी लागली, असेच म्हणावे लागेल.

एका वृत्तपत्रात 'मेळघाटात शंभरावर बालमृत्यू' या आशयाची बातमी ११ जुलै २०१८ रोजी प्रकाशित झाली होती. या वृत्ताच्या आधारे भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष प्रकाश बनसोड यांनी २ ऑगस्ट २०१८ रोजी राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रारीद्वारे सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करावी, अशा मागणी तक्रार दिली होती. या तक्रारीत प्रकाश बनसोड यांनी मेळघाटात आदिवासी, दलित समाजातील महिला आरोग्य सुविधाविना आणि बालके कुपोषणाचे बळी ठरत आहे. शासन, प्रशासकीय यंत्रणा कुचकामी ठरल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. ही बाब अत्यंत गंभीर असून मानवी हक्क अधिकार आयोगाशी संबंधित असल्यामुळे दोषींवर कठोर कारवाई करावी, असे बनसोड यांनी तक्रारीत नमूद केले होते. मात्र, सात वर्षांनंतर राज्य मानवी हक्क आयोग मुंबई यांनी त्यांच्याकडील केस क्रमांक ५७५५/२०१८ हे



प्रकरण सुनावणीस आहे. या अनुषंगाने जिल्हा प्रशासन अलर्ट झाले असून अपर जिल्हा दंडाधिकारी अनिल भटकर यांनी जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी अतुल भडांगे यांना सुनावणीस हजर राहण्याबाबत पत्र पाठविले आहे.

**मेळघाटात बालमृत्यू आटोक्यात आल्यानंतर सुनावणी**

जिल्हा प्रशासनाने जानेवारी २०२२ पासून मेळघाटमधील कुपोषण, बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्यासाठी राबवलेल्या 'मिशन मेळघाट २८' हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे धारणी आणि चिखलदरा तालुक्यांतील कुपोषणाचे प्रमाण कमी झाले असून संस्थात्मक प्रसूतीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे बालमृत्यू थांबले असून जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांना 'स्कॉच अवॉर्ड' देखील जाहीर झाला आहे. मेळघाटात बालमृत्यू आटोक्यात आल्यानंतर सुनावणी होत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

# अमरावती येथील मुख्य वनसंरक्षकांच्या बंगल्यावर १४ वनमजूर

## तक्रार पोहचली थेट मुख्य सचिवांकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती वन विभाग (प्रादेशिक)च्या मुख्य वनसंरक्षक जयोती बॅनर्जी यांच्या बंगल्यावर एक, दोन नव्हे तर तब्बल १४ वनमजूर दिमतीला असल्याची तक्रार थेट मुख्य सचिवांकडे पाठविण्यात आली आहे. या नियमबाह्य कारनाम्याची चौकशी व्हावी, यासाठी एका विधिज्ञांच्या नावाचा वापर करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र या तक्रारीशी आपला काहीही संबंध नाही. आपल्या नावाचा वापर करून कोणीतरी मुख्य सचिवांकडे तक्रार केल्याचे 'त्या' विधिज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे सोशल मीडियावर व्हायरल होत असलेली ही तक्रार खरी की खोटी? याचा शोध आता वन विभाग घेत




आहे.

वन विभागाचा कारभार हा ब्रिटिशकालीन असाच असतो. याचा प्रत्यय अनेकदा बड्या वनाधिकाऱ्यांच्या वागणुकीतून अनुभवता येतो. मग मुख्य वनसंरक्षक असो वा क्षेत्र संचालक, वनसंरक्षक, उपवनसंरक्षक, विभागीय वनाधिकारी, सहायक वनसंरक्षक या दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे वनमजूर हा त्यांचा घरगडी म्हणून दिमतीला असतो. यात प्रादेशिक, वन्यजीव, सामाजिक वनीकरण, कार्य आयोजना या उपविभागातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. मात्र, सीसीएफ जयोती बॅनर्जी यांच्या बंगल्यांवर १४ वनमजूर कार्यरत असल्याची तक्रार नेमकी कोणी, का केली? याचा शोध घेतला जात आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने अमरावती वन विभागातील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला आहे. अमरावती येथील ड. मनीष देशमुख हे तक्रारदार असून, सीसीएफ बॅनर्जी यांच्या बंगल्यावर १४ वनमजूर नियमबाह्य दिमतीला असल्याचे पत्र थेट राज्याच्या मुख्य सचिवांकडे पाठविण्यात आले आहे. त्यामुळे अमरावती वन विभागातील 'टॉप टू बॉटम' अधिकारी धास्तावले आहेत. यासंदर्भात सीसीएफ जयोती बॅनर्जी यांच्याशी संपर्क साधला असता त्या उपलब्ध झाल्या नाहीत.

# राज्यात 'आयएफएस'च्या बदल्यांची धूम; मंत्रालयात अधिकाऱ्यांचा ठिय्या

## विभागीय वनाधिकाऱ्यांच्या 'क्रीम' पोस्टिंगवर नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

हल्ली भारतीय वनसेवा अधिकारी (आयएफएस) यांच्या बदल्यांची धूम आहे. 'क्रीम' पोस्टिंग पदरात पडावे, यासाठी वन मंत्रालयात तब्बल ५० ते ५५ अधिकाऱ्यांनी ठिय्या मांडल्याची माहिती आहे. मलईदार जागेसाठी सचिवांपासून तर पीएस अशी धावाधाव सुरू आहे, तर २७ नवीन 'आयएफएस' अवॉर्डप्राप्त 'डीसीएफ' यांची मुंबईवारी जोरात सुरू आहे. 'आयएफएस'च्या बदल्यांसाठी एक, दोन दिवसात बदली समितीची बैठक होईल, असे संकेत आहेत.

वन विभागात राज्यस्तरावर केवळ २२९ आरएफओंच्या बदल्या करण्यात आल्या असून, विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षकांच्या बदल्या अद्याप झालेल्या नाहीत. याशिवाय अनेक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर येथील वन भवनात एकाच शाखेत ठाण मांडून आहेत. तसेच उपवनसंरक्षक दर्जाच्या ५५ ते ६०पेक्षा जास्त अधिकाऱ्यांचा बदल्या अद्याप झालेल्या नाहीत. यात २० ते २२ बदलीपात्र उपवनसंरक्षकांना 'आयएफएस' पदस्थापना करणे गरजेचे झाले आहे. अनेक अवॉर्डप्राप्त डीसीएफ 'क्रीम' पोस्टिंगसाठी राजकीय आश्रयाला गेल्याची माहिती आहे. 'आयएफएस' अधिकाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात वन विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर यांच्याशी वारंवार संपर्क साधला असता ते उपलब्ध झाले नाहीत, हे विशेष.

**'त्या' २७ आयएफएसची क्रीम जागांवर नजर**

केंद्र शासनाच्या पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालयाचे अवर सचिव प्रदीपकुमार यांनी ३ जून २०२५ रोजी महाराष्ट्रातील तब्बल २७ विभागीय वन अधिकाऱ्यांना राज्य कोट्यातून भारतीय वनसेवेत पदोन्नती दिली आहे. त्यामुळे या आठवड्यात होणाऱ्या बदलीत या २७ आयएफएस यांनी 'क्रीम' जागांवर पोस्टिंगसाठी नजर वळविली आहे. त्यामुळेच मंत्रालयात आयएफएसची गर्दी वाढल्याचे चित्र आहे.

# राजापेठ पोलिसांची वाहन चोरी प्रकरणात मोठी कारवाई; ५.२० लाखांचा मुद्देमाल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

एमआयडीसी रोडवरील श्रीकृष्ण मंदिरासमोरील परिसरातून दर्शनासाठी आलेल्या दर्शन जावारकर यांची सुझुकी ॲक्सेस दुचाकी चोरी गेल्यानंतर राजापेठ पोलिसांनी वाहनचोरीच्या साखळीचा पर्दाफाश करत तब्बल सहा मोटारसायकली जप्त केल्या. यातील एकूण मुद्देमालाची किंमत सुमारे ५ लाख २० हजार रुपये इतकी आहे.

दि. ५ फेब्रुवारी रोजी दर्शनासाठी गेलेल्या फिर्यादीची गाडी चोरीस गेली होती. तक्रारीवरून पोलिसांनी तपास सुरु केला असता गुप्त माहितीच्या आधारे आरोपी साहील अनील राऊत (रा. खरैया नगर) याला अटक करून चौकशी केली. त्याने गुन्ह्याची कबुली देत गाडी पराग मनीष अग्रवाल (रा. दस्तुर नगर) याच्या मदतीने चोरी केल्याचे सांगितले. पुढील तपासात चोरी केलेल्या मोटारसायकली अझर फारूक सिद्दीकी (रा. गडचिरोली) यास विकल्याचे उघड झाले.

पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये पो.उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त जयदत्त भवर आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वाखाली राजापेठ पोलिसांचे संपूर्ण पथक, तसेच सायबर शाखेच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

### तिघांकडून खालील सहा गाड्या जप्त करण्यात आल्या

१. बजाज पल्सर २२० – १,१०,०००
२. होंडा ॲक्टिव्हा (निळी) – ९०,०००
३. होंडा ॲक्टिव्हा (पांढरी) – ९०,०००
४. टीव्हीएस ज्युपिटर – ९०,०००
५. सुझुकी ॲक्सेस (पोपटी-पांढरी) – ८०,०००
६. होंडा ॲव्हीएटर (केसरी) – ६०,०००

# पेपर कपमधून चहा पिणे धोक्याचे? प्लास्टिक आवरण असलेल्या चहाच्या कागदी कपांवर बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी कागदी कपांमधून चहा देण्याचे प्रकार सुरू झाले. अनेकांना आता कागदी कपातून चहा पिण्याची सवय झाली आहे. मात्र, हीच सवय आरोग्यास हानीकारक असून एका दिवसात तीन वेळा कागदी कपातून चहा प्यायल्यास सूक्ष्मस्वरूपातील प्लास्टिकचे जवळपास ७५ हजार कण शरीरात जात असल्याचे संशोधनातून समोर आले.



सामाजिक कार्यकर्त्यांनी या कपांवर बंदी घालण्याची मागणी केली, अखेरीस प्लास्टिकचे आवरण असलेल्या चहाच्या कागदी कपांवर बंदी घालण्याचे आदेश अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाने काढले आहेत. येथील सामाजिक कार्यकर्ते ड राम बुरंगे यांनी यासंदर्भात प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला आता यश आले आहे.

कर्करोगासारख्या दुर्धर आजारांना कारणीभूत असलेल्या प्लास्टिक आवरण असलेल्या चहाच्या कागदी कपांवर बंदी घालण्यासंदर्भात नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी आणि कार्यवाहीचा अहवाल संबंधितांना कळवावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त, नगरपालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांना पत्रात म्हटले आहे.

चहा पिण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कागदी कपांना बीपीए नामक घातक रसायनाचा वापर करून प्लास्टिकचा थर देण्यात येतो. त्यातून प्लास्टिकचे सूक्ष्म कण शरीरामध्ये रक्ताद्वारे पसरतात. पर्यायाने हृदय, मूत्रपिंड, यकृताशी संबंधित आजार, दुर्धर असा कर्करोग होण्याचीही शक्यता असते, त्यामुळे या कपांवर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी ॲड. राम बुरंगे यांनी केली होती.

# जिल्हा परिषदेच्या २२ कर्मचाऱ्यांना पदोन्नती:कनिष्ठ सहायक बनलेत लिपिक


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

जिल्हा परिषदेच्या २२ कर्मचाऱ्यांना पदोन्नतीवर नवी पदस्थापना देण्यात आली आहे. मंगळवारी ही प्रक्रिया पूर्ण झाली. सीईओ संजीता महापात्र यांनी स्वत: या प्रक्रियेत सहभाग घेऊन सर्वांच्या पदस्थापनेला अंतिम रूप दिले. तत्पूर्वी सर्व कर्मचाऱ्यांचे समुपदेशनही करण्यात आले. पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये चार कनिष्ठ सहायक लिपिक, १४ चतुर्थ श्रेणी कर्मचारी आणि ४ परिचरांचा समावेश आहे. परिसर संवर्गातील कर्मचाऱ्यांना वाहनचालकपदी पदोन्नती देण्यात आली असून, कनिष्ठ सहायक लिपिकांना वरिष्ठ सहायक लिपिक करण्यात आले आहे. त्याचवेळी चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या विभागात नवी पदस्थापना देण्यात आली आहे. सीईओंच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या प्रक्रिये दरम्यान उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) सुदर्शन तुपे, सहायक प्रशासन अधिकारी नीलेश तालन, कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने, वरिष्ठ सहायक सुजित गावंडे तसेच सतीश पवार यांची उपस्थिती होती.

# अमरावतीचे सुपुत्र स्वप्नील वानखडे झाले जिल्हाधिकारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती :**

अमरावती च्या अर्जुन नगर परिसरातील राहिवासी स्वप्नील वानखडे हे मध्यप्रदेशच्या दातीया जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. यापूर्वी वानखडे यांनी जबलपूर महानगरपालिका आयुक्तपदी




त्यांसतना जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारीपदी यशस्वी कामगिरी बजावली आहे. आता मध्यप्रदेश सरकारने त्यांना जिल्हाधिकार्य पदी नियुक्ती देत त्यांच्या कार्याचा सन्मान केला आहे. स्वप्नील वानखडे यांच्या जिल्हाधिकारी नियुक्तीमुळे अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# टिप्पर - पिकअप वाहनाचा भीषण अपघात : चालकाच्या बाजूने बसलेल्या युवकाचा दुर्दैवी मृत्यू

## परतवाडा मार्गावर मार्की जवळ भीषण अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मार्की परतवाडा**

परतवाडा अमरावती मार्गावर आज बुधवार सकाळी दहा वाजताच्या सुमारास दोन चारचाकी वाहनात भीषण अपघात घडला. या अपघातात एक तारून युवकाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

पोलीस सूत्रांच्या मिळालेल्या माहिती नुसार परतवाडा ते अमरावती च्या दिशेने येणाऱ्या डम्पर टिप्पर च्या मागे असलेल्या मालवाहू टाटा



एस वाहनाने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला.. या दरम्यान चालकाच्या बाजूने बसलेला युवकाचा खाली तोल जाऊन ट्रक च्या चाकात आल्याने जागीच अंत झाला...निंबारी अचलपूर राहणारा २२वर्षीय नमन गोपाळ सगणे असे मृत युवकांचे नाव आहे.तर चालक यश धनराज गोळे वय ३१ राहणार कोल्हा काकडा याच्या सह दुसरा युवक यश गोळे जखमी झाल्याने त्याला उपचारा करिता जिल्हा सामान्य रुणालयात दाखल करण्यात आले. घटनास्थळी आसेगाव पोलिसांनी धाव घेतली..

काही वेळ रस्त्यावर वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली होती.घटनास्थळी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती.अमरावती परतवाडा मार्गावर असलेल्या खड्ड्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला.आसेगाव ते पूर्णा नगर रस्त्यावरखड्डे पडल्याने वारंवारअपघात होत आहे. याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार असल्याची प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली.

# नाली तयार करण्यासाठी एकाने गावातील मुख्य रस्ता फोडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ टाकरखेडा संभू**

येथील परतवाडा-पूर्णानगर -रामा -चांदूर बाजार-साऊर या मुख्य रस्त्यावर सध्या धोक्याची स्थिती निर्माण झाली आहे. गावाच्या मध्यभागातून जाणारा हा रस्ता नाली तयार करण्याच्या उद्देशाने अज्ञाताने फोडल्यामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या ऐन मधोमध ही स्थिती निर्माण झाल्यामुळे छोटे अपघातही होत आहेत. या गंभीर बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने संबंधितांविरुद्ध नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.



परतवाडा-पूर्णानगर- रामा - चांदूर बाजार-साऊर आदी मार्गावरील वाहतूक या मुख्य मार्गावरूनच केली जाते. असे असतानाही या मार्गावर अलीकडे रस्ता फोडल्याने मोठी नाली निर्माण झाली आहे. या फोडलेल्या रस्त्याचे काम पूर्ण न करता तसेच रस्ता फोडताना याची पूर्व रस्ता खोदल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात काही नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्कही साधला. परंतु हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आता सामूहिकपणे संबंधितांच्या कार्यालयावर धडकावे लागणार का, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे